७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक
गुरुवार, दि. २५ जून २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १८० | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

# भाविकांची कोणतीही गैरसोय होणार नाही

**मुंबई (दै. संध्या)**

- वारकऱ्यांच्या सेवेसाठी शासन सज्ज
- आषाढी वारीसाठी सर्व विभागांकडून सुविधांची व्यापक तयारी
- डिस्कव्हरी व जिओग्राफी दूरचित्रवाहनीद्वारे वारी सोहळा पोहचणार जगभर



## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

आषाढी वारी ही वारकरी संप्रदायाच्या श्रद्धेचा आणि महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचा महत्वपूर्ण सोहळा आहे. यंदाच्या वारीत लाखो भाविकांची कोणतीही गैरसोय होणार नाही यासाठी सर्व विभागांच्या समन्वयातून व्यापक नियोजन करण्यात यावे. वारीचा उपक्रम डिस्कव्हरी व जिओग्राफी दूरचित्रवाहिनीद्वारे जगभरात पोहोचणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

विधानभवनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली तीर्थक्षेत्र पंढरपूर येथील आषाढी एकादशीच्या अनुषंगाने पूर्वतयारीबाबत आढावा बैठक झाली, त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. बैठकीस उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, ग्रामविकास व पंचायत राज मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, पालखी सोहळा प्रमुख प्रतिनिधी उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मागील वर्षी निर्मलवारी उपक्रम प्रभावीपणे राबविला असून यंदाचीही वारी सर्वांच्या सहकार्याने आणि पांडुरंगाच्या आशिर्वादाने यशस्वीपणे पार पडेल असे नियोजन करावे. यंदाच्या वारीसाठी पालखी मार्गावरील रस्त्यांची मोठ्या प्रमाणात दुरुस्ती आणि मजबुतीकरण करण्यात आले. तसेच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या माध्यमातून विविध विकासकामे पूर्ण करण्यात आली आहेत. त्यामुळे पालखी मार्गावरील प्रवास अधिक सुरक्षित आणि सुलभ होणार आहे. वारकऱ्यांच्या मुक्कामस्थळी मोठ्या प्रमाणावर जर्मन हँगर उभारण्यात आले असून संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज तसेच इतर पालख्यांच्या मुक्कामस्थळी जर्मन हँगरची व्यवस्था करण्यात आली आहे. यामुळे लाखो वारकऱ्यांना सुरक्षित आणि प्रशस्त निवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे.

पुणे विभागाबाहेरील पालख्यांनाही सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. त्यासाठी सोलापूर जिल्ह्यांचे पालकमंत्री यांची नोडल पालकमंत्री व पुणे विभागीय आयुक्त यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे. डीजे मुक्त वारी सोहळ्यासाठी पोलीस प्रशासनाने सर्वांशी चर्चा करून प्रयत्न करावेत. वारी सोहळा हा पारंपरिक पद्धतीनेच साजरा करण्याचे आवाहनही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केले. पालखी सोहळा प्रमुखांनी केलेल्या मागण्यांचा सकारात्मक विचार केला जाईल असे ही मुख्यमंत्री यांनी यावेळी सांगितले."आषाढी वारी हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक जीवनाचा आत्मा आहे. लाखो वारकरी भाविकांना सुरक्षित, स्वच्छ आणि सुसज्ज सुविधा उपलब्ध करून देणे ही शासनाची जबाबदारी आहे. सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करून वारकऱ्यांना सर्वोत्तम सुविधा द्याव्यात. यंदाची वारी अधिक सुरक्षित, सुकर आणि संस्मरणीय करण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या की, पालखी सोहळा प्रमुखांनी ज्या ज्या मागण्या केल्या होत्या त्याप्रमाणे पालखी सोहळ्यातील सर्व कामे पूर्ण केली आहेत. महिलांसाठी रात्रीच्या मुक्कामाची विशेष काळजी घेतली आहे.

**अधिवेशनापूर्वी 'ऑपरेशन टायगर'वर फैसला होणार?**

# ठाकरेंच्या खासदारांनी घेतली लोकसभा अध्यक्षांची भेट

**मुंबई (दै. संध्या)**



पावसाळी अधिवेशनापूर्वी ऑपरेशन टायगरवर लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला फैसला करण्याची शक्यता आहे. टीएमसी आणि शिवसेना ठाकरेंच्या बंडखोर खासदारांच्या प्रकरणात पावसाळी अधिवेशनापूर्वी लोकसभा अध्यक्ष निर्णय घेतील अशी माहिती सुत्रांनी दिली आहे. दोन्ही पक्षांची सुनावणी पूर्ण झाली आहे. टीएमसी आणि शिवसेना ठाकरेंच्या नेत्यांनी अध्यक्षांची दोन वेळा भेट घेतली आहे. शिवसेना ठाकरे गटाच्या सहा खासदारांनी अध्यक्षांना भेटून शिंदेंच्या नेतृत्वातील शिवसेनेत सामील होण्याचे पत्र दिले आहे. लोकसभा सचिवालयातच कायदेशीर आणि घटनाविषयक तज्ज्ञांशी चर्चा सुरु आहे. डीएमके आणि टीएमसीच्या खासदारांना इंडिया आघाडीपासून वेगळे बसवण्याच्या प्रश्नावरही निर्णय होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. दरम्यान, ऑपरेशन टायगरनंतर आज लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी आज ठाकरेंच्या खासदारांना त्यांची बाजू मांडण्यासाठी बोलावले होते. या भेटीनंतर शिवसेना ठाकरे गटाचे खासदार अरविंद सावंत यांनी प्रतिक्रिया दिली आहे. एकत्रिकरणाचा प्रस्ताव दिला असेल तर त्यावर विचार होऊ नये. विलीनीकरणाच्या प्रस्तावावर निर्णय घेण्यापूर्वी मला कळवावं ही विनंती लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना केल्याची माहिती अरविंद सावंत यांनी दिली. सहा जणांबाबत जरी दोन तृतीयांश असेल तरी आमचं काही म्हणणं आहे. संविधानाचे उल्लंघन होईल असे पाऊल उचलले जाऊ नये. न्यायिक भूमिका घ्यावी अशे मत अरविंद सावंत यांनी व्यक्त केले.

# लाडकी बहीण योजनेत अनियमितता

### १२ हजारांहून अधिक सरकारी कर्मचाऱ्यांनी घेतला लाभ, १६५ कोटींच्या वसुलीची प्रक्रिया सुरू

**मुंबई (दै. संध्या)**




राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेत मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याची कबुली स्वतः सरकारने विधानसभेत दिली आहे. या योजनेचा तब्बल 12 हजार 415 शासकीय कर्मचाऱ्यांनी लाभ घेतल्याचे लेखी उत्तरातून समोर आले असून, या अपात्र लाभार्थ्यांना सुमारे 165 कोटी रुपयांचा लाभ मिळाल्याची धक्कादायक माहिती उघड झाली आहे. विधानसभेत सादर करण्यात आलेल्या माहितीनुसार, या योजनेच्या अंमलबजावणीबाबत विरोधकांकडून सातत्याने अनियमिततेचे आरोप केले जात होते. आता सरकारच्या लेखी उत्तरामुळे या आरोपांवर शिक्कामोर्तब झाल्याचे मानले जात आहे. लाडकी बहीण योजना ही आर्थिकदृष्ट्या गरजू महिलांसाठी सुरू करण्यात आली होती. मात्र, पडताळणीदरम्यान 12,415 शासकीय कर्मचारी या योजनेचा लाभ घेत असल्याचे आढळून आले. सरकारी सेवेत असलेले कर्मचारी या योजनेसाठी पात्र नसतानाही त्यांनी लाभ घेतल्यामुळे मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. याशिवाय काही पुरुष लाभार्थ्यांनीदेखील या योजनेचा लाभ घेतल्याचे समोर आले आहे. प्रत्यक्षात ही योजना महिलांसाठी असताना पुरुषांच्या नावावर लाभ कसा गेला, याबाबतही आता प्रश्न उपस्थित होत आहेत. सरकारने दिलेल्या माहितीनुसार, अपात्र लाभार्थ्यांनी मिळून सुमारे 165 कोटी रुपयांचा लाभ घेतला आहे. या रकमेची वसुली करण्यासाठी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना आणि विभागीय अधिकाऱ्यांना निर्देश देण्यात आले आहेत. राज्यभरात लाभार्थ्यांची पुन्हा पडताळणी करण्यात येत असून, नियमबाह्य पद्धतीने लाभ घेतलेल्या व्यक्तींविरुद्ध कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. सरकारच्या उत्तरात आणखी एक महत्त्वाची बाब समोर आली आहे. अनेक लाभार्थ्यांनी आवश्यक असलेली केवायसी (KYC) प्रक्रिया पूर्ण केली नव्हती. अशा लाभार्थ्यांचे अनुदान थांबवण्यात आल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. योजनेचा लाभ खऱ्या पात्र महिलांपर्यंत पोहोचावा यासाठी पडताळणी मोहीम अधिक कडक करण्यात आल्याची माहितीही देण्यात आली.

# राबविलेल्या उपक्रमामुळे कैद्यांचे यशस्वी पुनर्वसन

**मुंबई (दै. संध्या)**



गुन्हेगारीचा रस्ता सोडून कैद्यांनी पुन्हा एकदा समाजाच्या प्रवाहात यावे. भूतकाळ विसरून सन्मानाने जीवन जगावे आणि त्यांच्या कुटुंबालाही स्थैर्य मिळावे, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने राज्यातील विविध कारागृहांमध्ये कैद्यांच्या पुनर्वसनासाठी विशेष उपक्रम राबविला जात आहे.

यासाठी 'टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स' संस्थेशी सामंजस्य करार करण्यात आला आहे. या उपक्रमातून कैद्यांना गुन्हेगारी जग सोडून सकारात्मक आयुष्याची कास धरण्यासाठी मोठे मानसिक आणि सामाजिक बळ मिळत आहे. त्यांचे यशस्वी पुनर्वसन करण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या संवेदनशील विषयाकडे केवळ कायदा, सुव्यवस्था किंवा शिक्षेच्या दृष्टिकोनातून न पाहता, व्यापक सामाजिक सुधारणा म्हणून पाहिले आहे. त्यांच्या दूरगामी विचार सरणीमुळे आणि सततच्या पाठ पुराव्यामुळेच हा उपक्रम सध्या राज्यातील मुंबई, ठाणे, तळोजा, येरवडा (पुणे), नागपूर आणि नाशिक या प्रमुख मध्यवर्ती कारागृहामध्ये प्रभावीपणे सुरू आहे. यासोबतच भायखळा, कल्याण, लातूर आणि अलिबाग या जिल्हा कारागृहांमध्येही या उपक्रमांतर्गत कैद्यांच्या आयुष्याला नवी दिशा देण्याचे काम कारागृह प्रशासनाच्या सहाय्याने युद्धपातळीवर सुरू आहे. या उपक्रमाचे सकारात्मक आणि दूरगामी परिणाम आता दिसू लागले असून, कारागृहातील बंदीवान आपल्या नकारात्मक मानसिकतेतून बाहेर पडत आहेत. उपक्रमाची आखणी करताना कैद्यांच्या मानसिक, शारीरिक आणि आर्थिक अशा तिन्ही बाजूंवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. अनेकदा कायद्याच्या योग्य माहितीअभावी किंवा प्रदीर्घ न्यायालयीन प्रक्रियेमुळे कैदी नैराश्यात जातात. हीच बाब लक्षात घेऊन कारागृहांद्वारे कायदेविषयक विशेष शिबिरे आयोजित केली जात आहेत. तज्ज्ञ वकिलांमार्फत कैद्यांना त्यांच्या हक्कांची आणि कायदेशीर प्रक्रियेची सोप्या भाषेत माहिती दिली जात आहे. कैद्यांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्याची काळजी घेण्यासाठी नियमित वैद्यकीय आणि मानसोपचार शिबिरे आयोजित केली जात आहेत. कैदी जेव्हा आपली शिक्षा पूर्ण करून कारागृहातून बाहेर पडेल, तेव्हा तो आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व्हावा आणि त्याने पुन्हा गुन्हेगारीकडे वळू नये, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. यासाठी विविध कौशल्य विकास वृद्धिंगत करणारी व्यावसायिक आणि तांत्रिक प्रशिक्षण शिबिरे चालवली जात आहेत. या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे कैद्यांचा त्यांच्या कुटुंबीयांशी तुटलेला संपर्क पुन्हा जोडून देणे हे आहे. कारागृहातील बंदिवानांचा त्यांच्या कुटुंबीयांशी नियमित आणि आदरयुक्त संवाद साधून दिला जातो. यातील सर्वात संवेदनशील पाऊल म्हणजे, कैद्यांना त्यांच्या लहान मुलांसोबत प्रत्यक्षरित्या, कोणत्याही अडथळ्याविना समोरासमोर बसवून संवाद साधण्याची आणि त्यांना जवळ घेण्याची संधी दिली जात आहे. यामुळे कैद्यांमधील गुन्हेगारीची भावना नष्ट होऊन त्यांच्यात जबाबदार पालक आणि कौटुंबिक व्यक्ती म्हणून जगण्याची तीव्र इच्छा निर्माण होण्याचा विश्वास आहे. हा उपक्रम केवळ कैदी कारागृहात असेपर्यंतच मर्यादित नाही, तर तो जेव्हा शिक्षा पूर्ण करून बाहेर पडेल, तेव्हा समाजाने त्यांचा स्वीकार करावा यासाठीही व्यवस्था करण्यात आली आहे. कारागृहातून सुटल्यानंतर समाजात ताठ मानेने जगता यावे, यासाठी त्यांना शासनाच्या विविध कल्याणकारी आणि स्वयंरोजगार योजनांचा थेट लाभ मिळवून देण्याकरिता मदत करण्यात येत आहे. बँक कर्ज, ओळखपत्रे आणि इतर कागदपत्रे मिळवून देण्याकरिता मदत करण्यात येत आहे.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
e-paper www.sandhyaepaper.com

**ढिंग-टांग**




## नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांची कोणतीही गय केली जाणार नाही : तुकाराम मुंढे

# हॉटेल्समध्ये मोफत शुद्ध पाणी देणे बंधनकारक

**मुंबई (दै. संध्या)**



राज्यातील नागरिकांना दर्जेदार आणि सुरक्षित अन्न मिळावे, या उद्देशाने अन्न व औषध प्रशासन विभागाकडून सध्या 'सुरक्षित अन्न, निरोगी महाराष्ट्र' ही विशेष मोहीम राबवण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर राज्याचे अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांनी सर्व अन्न व्यावसायिकांना कडक शब्दांत इशारा दिला आहे. राज्यातील सर्व हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, धाबे, खानावळी आणि ज्या-ज्या ठिकाणी अन्नप्रक्रिया केली जाते, अशा सर्व आस्थापनांनी अन्नसुरक्षेच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक आहे. या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांची कोणतीही गय केली जाणार नाही आणि त्यांना कुणीही वाचवू शकणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले आहे. अन्नसुरक्षेसोबतच ग्राहकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही मुंढे यांनी गांभीर्याने घेतला आहे. प्रत्येक हॉटेल आणि रेस्टॉरंटने ग्राहकांना पिण्यायोग्य आणि सुरक्षित पाणी मोफत उपलब्ध करून देणे अनिवार्य आहे. तसेच, ग्राहकांना माहिती व्हावी यासाठी 'येथे पिण्याचे शुद्ध पाणी मोफत मिळेल' अशा आशयाचा फलक दर्शनी भागात लावण्याचे निर्देशही त्यांनी दिले आहेत. या सर्व नियमांची आणि सूचनांची योग्य अंमलबजावणी न करणाऱ्या आस्थापनांवर प्रशासनाकडून धडक कारवाई करण्यात येईल, असा सक्त इशाराही तुकाराम मुंढे यांनी दिला आहे. तुकाराम मुंढे पत्रकार परिषदेत बोलताना म्हणाले की, "अन्नात कुठेही भेसळ होऊ नये यासाठी काही पावले उचलण्यात येतात, त्याची जबाबदारी राज्याच्या एफडीए आयुक्तांवर असते. 23 जून रोजी एक आदेश काढण्यात आला आहे. त्यानुसार राज्यातील सर्व हॉटेल्स, रेस्टॉरंट्स आणि इटरिज यांनी नियम पाळणे बंधनकारक असेल. अन्न व सुरक्षा मानके यानुसार त्यांनी रजिस्ट्रेशन करावं. अन्न उत्पादन मानके, 2011 याच्यासह अनेक नियमांची अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. तसेच शाळेच्या मुलांच्या सुरक्षेसाठी नियमांची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे." राज्यात सध्या सुरू असलेल्या 'सुरक्षित अन्न, निरोगी महाराष्ट्र' मोहिमेअंतर्गत प्रशासनाने केलेल्या तपासण्यांमध्ये अन्नसुरक्षेबाबत अनेक गंभीर त्रुटी उघडकीस आल्या आहेत. या मोहिमेदरम्यान आस्थापनांमध्ये अत्यंत अस्वच्छ आणि अपायकारक परिस्थितीत अन्न शिजवणे, खाद्यपदार्थ बनवण्यासाठी एकदा वापरलेल्या तेलाचाच पुन्हा वापर करणे आणि अन्नपदार्थांसाठी अत्यंत निकृष्ट दर्जाचे पॅकेजिंग वापरणे अशा आरोग्यास घातक ठरणाऱ्या अनेक धक्कादायक बाबी निदर्शनास आल्या आहेत.

### FDA वर सभागृहात खळबळ

राज्यातील अन्न व औषध प्रशासन (FDA) विभागाच्या कारभारावर विधानसभेत जोरदार चर्चा रंगली. या चर्चेदरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)चे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी FDA आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या कामाचे कौतुक करताना अत्यंत गंभीर आरोप केले. मुंढे यांच्या कारवाईमुळे अडचणीत आलेल्या काही लॉबींनी त्यांच्या बदलीसाठी तब्बल 250 कोटी रुपये गोळा केल्याचा दावा आव्हाड यांनी सभागृहात केला. सभागृहात बोलताना आव्हाड म्हणाले की, महाराष्ट्रात सध्या अन्न भेसळ, निकृष्ट दर्जाची औषधे आणि सार्वजनिक आरोग्याशी संबंधित गंभीर प्रश्न चर्चेत आहेत. या पार्श्वभूमीवर FDA विभागाला राज्याच्या चर्चेच्या केंद्रस्थानी आणण्याचे श्रेय तुकाराम मुंढे यांना जाते. ते म्हणाले, "महाराष्ट्राला कॅन्सरच्या विळख्यात ढकलणाऱ्या आणि लोकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या घटकांविरोधात कठोर कारवाई करणारा अधिकारी म्हणून तुकाराम मुंढे पुढे आले आहेत. त्यामुळे त्यांचे अभिनंदन केले पाहिजे." यावेळी आव्हाडांनी सर्वात मोठा आरोप करत सांगितले की, FDA च्या कारवायांमुळे अनेक औषध कंपन्या आणि संबंधित हितसंबंधी गट अडचणीत आले आहेत. "मुंढेंनी अनेक ड्रग कंपन्यांना कामाला लावलं आहे. त्यामुळे त्यांच्या बदलीसाठी इंटरनॅशनल ड्रग लॉबी सक्रिय झाली आहे. फक्त तुकाराम मुंढेंची बदली व्हावी यासाठी 250 कोटी रुपये जमा करण्यात आल्याची माहिती माझ्याकडे आहे," असा दावा त्यांनी केला.

# माहिती अधिकार कायद्याच्या नियमांत बदल

### अण्णा हजारे सरकारच्या भूमिकेवर नाराज, ५ जुलैच्या उपोषणाचा इशारा कायम



**अहिल्यानगर (दै. संध्या)**

### माहिती देणे हा नियम, नाकारणे हा अपवाद असायला हवा

अण्णा हजारे यांनी पत्रात नमूद केले आहे की, १९९८ पासून त्यांनी माहितीच्या अधिकारासाठी संपूर्ण महाराष्ट्रभर दौरे केले आणि अनेकदा ऐतिहासिक उपोषणे केली. मात्र, २० वर्षांनंतर सरकारने केलेल्या नवीन दुरुस्त्या या कायद्याचा मूळ आत्माच नष्ट करणाऱ्या आहेत. जनतेला विश्वासात न घेता हे नियम तयार करण्यात आले असून, यामुळे 'माहिती देणे अपवाद आणि माहिती नाकारणे हाच नियम' अशी उलटी परिस्थिती निर्माण होईल, अशी भीती अण्णा हजारे यांनी व्यक्त केली आहे.

ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी बुधवारी राज्य सरकारच्या प्रतिनिधींशी झालेल्या बैठकीनंतरही समाधान व्यक्त केले नाही. सरकारकडून त्यांच्या मागण्यांबाबत ठोस आश्वासन मिळाले नसल्याने त्यांनी 5 जुलैपासून जाहीर केलेल्या उपोषणाचा इशारा कायम ठेवला आहे. बुधवारी दुपारी महाराष्ट्राचे मुख्य माहिती आयुक्त राहुल पांडे यांच्या नेतृत्वाखालील शासकीय अधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळाने अण्णा हजारे यांची भेट घेतली. या बैठकीत त्यांच्या विविध मागण्यांवर चर्चा करण्यात आली. मात्र, चर्चेनंतर अण्णा हजारे यांनी सरकारच्या प्रतिसादाबाबत नाराजी व्यक्त केली. अण्णा हजारे म्हणाले की, सरकारकडून अद्याप त्यांच्या मागण्यांवर स्पष्ट आणि समाधानकारक भूमिका समोर आलेली नाही. त्यामुळे ते सरकारच्या पुढील उत्तराची प्रतीक्षा करणार आहेत. यासंदर्भात आणखी एक फेरी चर्चा होणार असल्याचेही त्यांनी सांगितले. सरकारसोबत होणारी पुढील चर्चा यशस्वी झाली नाही, तर 5 जुलैपासून नियोजित उपोषण सुरू करण्यात येईल, असा इशारा अण्णा हजारे यांनी दिला. त्यामुळे सरकार आणि अण्णा हजारे यांच्यातील चर्चेकडे राज्याचे लक्ष लागले आहे. या बैठकीला पुणे विभागीय माहिती आयुक्त मकरंद रानडे, संभाजीनगर विभागीय माहिती आयुक्त प्रकाश इंदलकर, अण्णा हजारे यांचे सहकारी दत्ता आवारी, ॲडव्होकेट श्याम असावा यांच्यासह अन्य संबंधित व्यक्ती उपस्थित होत्या. अण्णा हजारे यांनी सरकारच्या भूमिकेबाबत असमाधान व्यक्त केल्याने येत्या काही दिवसांत सरकारवर दबाव वाढण्याची शक्यता आहे. पुढील चर्चेत सरकार त्यांच्या मागण्यांवर कोणती भूमिका घेते आणि उपोषण टळते का, याकडे राज्यभरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे. "माहितीचा अधिकार (RTI) हा शासनाने जनतेवर केलेला उपकार नसून तो नागरिकांचा घटनात्मक अधिकार आहे. मात्र, राज्य सरकारने १२ जून २०२६ रोजी प्रसिद्ध केलेले 'महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २०२६' हे या कायद्याची धार बोथट करणारे आणि भ्रष्टाचाराला ढाल देणारे आहेत. प्रशासनातील ही हुकूमशाही मोडून काढण्यासाठी आणि माहितीचा अधिकार वाचवण्यासाठी मी माझ्या प्राणाची आहुती देण्यासही मागे हटणार नाही," असा थेट आणि निर्वाणीचा इशारा ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी राज्य सरकारला दिला आहे. या संदर्भात अण्णा हजारे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना एक सविस्तर आणि कडक पत्र पाठवले असून, १२ जूनच्या बेकायदेशीर दुरुस्त्या त्वरित रद्द न केल्यास ५ जुलै २०२६ पासून राळेगणसिद्धी येथील यादवबाबा मंदिरात आमरण उपोषण सुरू करणार असल्याचा इशारा दिला आहे.

# संपादकीय

## जेनेरिक औषधांच्या दर्जाबाबत बड्या कंपन्यांची बनवेगिरी

'जेनेरिक-औषधे' तुलनेने स्वस्त असतात हे आता सर्वांना माहीत आहे; पण त्यांचा दर्जा चांगला नसतो असा बहुसंख्य डॉक्टर्सचा व काही नागरिकांचा समज असतो. तो कितपत बरोबर आहे, असा प्रश्न एका अलीकडील पाहणी-अभ्यासातूनही पुढे आला आहे.

सुरुवातीला काही मूलभूत गोष्टी स्पष्ट केल्या पाहिजेत. 'जेनेरिक-औषध' या शब्दाचे दोन अर्थ आहेत. पहिला - ज्या औषधाच्या बाबतीत पेटंट-कायद्याची मुदत संपली आहे असे औषध. या अर्थाने भारतीय बाजारपेठेतील ९० टक्क्यांहून जास्त औषधे 'जेनेरिक' म्हणजे पेटंट-मुदत संपलेली आहेत. 'मी जेनेरिक औषधे वापरत नाही' असे म्हणणारे डॉक्टर्सही बहुतांश जेनेरिक, म्हणजे पेटंट-मुदत संपलेली औषधे वापरतात. 'जेनेरिक'चा दुसरा अर्थ – ज्याच्या वेष्टणावर औषधाचे मूळ म्हणजे जेनेरिक नाव आहे असे औषध. सर्व वैज्ञानिक पुस्तके, साहित्य इ. मध्ये औषधाचे जेनेरिक नावच वापरले जाते. मात्र, हे औषध शोधणारी संशोधक औषध कंपनी ते औषध मूळ म्हणजे जेनेरिक नावाने न विकता त्याला स्वत:चे टोपण नाव उर्फ ब्रॅण्ड नेम देते. भारतात सुमारे ९०० जेनेरिक औषधांचे ६०,००० च्या वर असे ब्रॅण्ड्स आहेत. आपापले ब्रॅण्ड-नाव डॉक्टरांच्या मनावर बिंबवण्यासाठी औषध कंपन्या प्रचंड पैसा खर्च करून भलेबुरे मार्गही वापरतात. याउलट डॉक्टर्सचे शिक्षण जेनेरिक नावांच्या मार्फतच झाले असल्याने जेनेरिक नावे डॉक्टरांच्या मनावर कोरण्यासाठी औषध कंपन्यांना पैसे खर्च करायची गरज नसते. म्हणून 'ब्रॅण्डेड-जनरिक' औषधांच्या तुलनेत जेनेरिक औषधे बरीच स्वस्तात विकता येतात.

फक्त नावाजलेल्या ब्रॅण्ड्सचा दर्जा चांगला असतो हा समज सखोल संशोधनावर आधारित नाही. बड्या कंपन्यांच्या इतक्या वर्षांच्या खोट्या प्रचारामुळे व या कंपन्यांनी अनेक डॉक्टर्सना 'आपलेसे' केल्याने डॉक्टर्समध्ये हा गैरसमज पसरला आहे. मुळात भारतात कमी दर्जाच्या औषधांचे प्रमाण आता खूप कमी झाले आहे. उदाहरणार्थ २०२४-२५ मध्ये केलेल्या राष्ट्रीय पाहणीमध्ये आढळले की, भारतात ठिकठिकाणाहून गोळा केलेल्या १,१६,३२३ औषध नमुन्यांपैकी फक्त ३१०४ (२.७ टक्के) औषधांचा दर्जा कमी होता (हे प्रमाण शून्य व्हायला हवे.). मात्र हे खरे आहे की कोणत्याही लहान-मोठ्या औषध कंपन्यांच्या औषधांचा दर्जा चांगलाच असेल अशी खात्री नसते. या सर्व पार्श्वभूमीवर काही दिवसांपूर्वी कोची (केरळ) मधील डॉ. अॅबे फिलिप्स हे जनवादी 'लिव्हर स्पेशालिस्ट' व काही नागरिक यांनी औषधांच्या दर्जाबाबत केलेला अभ्यास महत्त्वाचा आहे. 'क्राउड फंडिंग'मार्फत पैसे गोळा करून त्यांनी केलेल्या या अभ्यासात त्यांनी ७ प्रकारच्या औषध विक्रेत्यांकडून एकूण २२ प्रकारच्या औषधांचे १३१ नमुने विकत घेतले. खालील प्रकारच्या औषधांचा त्यात समावेश होता, उदाहरणार्थ वेदनाशामक, अँटिबायोटिक्स, पचनसंस्थेवरील औषधे, हृदयविकार, मधुमेह यावरील औषधे, श्वसन-आजारावरील व अॅलर्जीवरील औषधे, जीवनसत्त्वे.. त्यात होती. या अभ्यासात बड्या कंपन्यांचे महागडे ब्रॅण्ड व छोट्या कंपन्यांचे स्वस्त ब्रॅण्ड तसेच सरकारच्या जनऔषधी दुकानातून व इतर ठिकाणांहून जेनेरिक नावाने मिळणारी औषधे विकत घेतली. 'इंडियन फार्माकोपिया-२०२२' या प्रमाणभूत ग्रंथात दिलेल्या प्रमाणित मानकांप्रमाणे सर्वांचे पाच प्रकारचे गुणधर्म तपासले. त्यासाठी हे १३१ औषध नमुने उच्च दर्जाच्या मान्यताप्राप्त प्रयोगशाळेत पाठवले. तेव्हा आढळले की महागडे ब्रॅण्ड्स, कमी महागडे ब्रॅण्ड्स व जनऔषधी वा इतरत्र जेनेरिक नावाने मिळणारी औषधे यांच्या दर्जात काहीच फरक नव्हता! (तपशिलासाठी पाहा- https://meshindia.org/citizens-generic-vs-branded-drugs-project/). ब्रॅण्ड-नावामुळे औषधांच्या नावाभोवती बनवलेले वलय घालवण्यासाठी व त्याच्या प्रभावाखाली औषध कंपन्यांची लपणारी नफेखोरी थांबवण्यासाठी १९७५ मध्ये हाथी समितीने शिफारस केली होती की, टप्प्याटप्प्याने ब्रॅण्ड-नावे रद्द करून फक्त जेनेरिक नावाने औषधे विकण्याची परवानगी द्यावी.

## संस्कृत सुभाषित

द्विधा भज्येयमप्येवं न नमेयं तु कस्यचित्।
एम मे सहजो दोषः स्वभावो दुरतिक्रमः।।

रावण म्हणतो, ''माझे दोन तुकडे होतील, पण कोणासमोरही मी वाकणार नाही. कोणाचाही स्वभाव बदलता येणे शक्य नसते.

## गुरु वचन

### वास्तव्याची जाण

एका राज्याचा राजा दररोज सकाळी फेरफटका मारण्यासाठी जात होता. त्याला रस्त्यात जी व्यक्ती पहिल्यांदा दिसेल त्याची तो प्रत्येक इच्छा पूर्ण करायचा.

असेच एका दिवशी निघाला असता त्याला एक ब्राह्मण भेटला. राजाने त्याला विचारले की, ब्राह्मण देवता मी आपली काय मदत करु. ब्राह्मण लाजून म्हणाला, महाराज आपण जे उचित समजाल त्यावर राजा म्हणाला, आपण सांगा काय पाहिजे. ब्राह्मणाच्या मनात लोभ आला. तो राजला म्हणाला, महाराज आपण फिरून या तोपर्यंत मी विचार करतो की, मला काय पाहिजे. ब्राह्मणाचे म्हणणे ऐकून राजा फिरण्यासाठी गेला. नंतर ब्राह्मणाच्या मनात विचार आला की, अशी संधी पुन्हा–पुन्हा मिळत नाही. एकदाच असे काही तरी मागतो की, पुन्हा कधी काही मागण्याची गरज पडणार नाही. राजा फिरून आला व त्याने ब्राह्मणाला त्याची इच्छा विचारली. तेव्हा ब्राह्मणने राजाला पूर्ण राज्य मागीतले. राजानेही ताबडतोब यासाठी होकार दिला व ब्राह्मणाला म्हणाला, मी तर अनेक दिवसांपासून याची प्रतिक्षा करत होतो की या ओझ्यातून केव्हा मुक्त होईल. आपण येथेच थांबा मी राज्याचा कारभार आपल्याकडे सोपवण्याची व्यवस्था करतो. असे म्हणून राजा महालात जातो. राजाचे म्हणणे ऐकून ब्राह्मण चिंतेत पडतो. त्याला वाटत नव्हते की, राजा एवढ्या सोप्या पद्धतीने राज्य सोपवून देईल. ब्राह्मणाच्या मनात ईश्वरीय भावना जागृत झाली आणि त्याने विचार केला की, वास्तविकतेमध्ये वैरागी तर राजा आहे. मी तर फक्त ढोंग करतो. हा तर मोहापासून दूर आहे. ब्राह्मणाला वास्तव्याची जाण झाली आणि तो तिथून निघून गेला. त्याला आपल्या मोहावर पश्चाताप झाला.

## उपदेशकथा

### अंधानुकरण

एकदा एका गावात खूप मोठा उत्सव होता. मिरवणुकीची तयारी चालली होती. गावातील मोठमोठे लोक मिरवणुकीत सामील झाले होते. ज्या रस्त्यावर मिरवणूक जाणार होती त्या रस्त्याची सफाई करण्यात येत होती. सगळीकडे रोषणाई केली होती पण अचानक त्या स्वच्छ रस्त्यावर एका कुत्र्याने मलविसर्जन केले. सेवक अवाक् झाले. काही क्षणात मिरवणूक येतच होती. अत्यंत कमी वेळ होता त्यामुळे सेवकांना काय करावे सुचेना. कुत्र्याच्या मलाचा दुर्गंध येऊ नये व ते दिसू नये म्हणून एका सेवकाने एक युक्ती केली. मिरवणुकीसाठी सुगंधी व सुंदर फुले आणलेली होती. त्यातील काही फुले त्यावर टाकून ते मल झाकून टाकले. मिरवणूक आली. मध्येच फुले वाहिलेलं ते ठिकाण पाहून व देवतास्थान समजून प्रत्येकाने काहीही विचार न करता त्यावर फुले वाहिली व नमस्कार करून जाऊ लागले. लोकांचा हा मूर्खपणा पाहून सेवक मनात हसला.

कथा उपदेश : गतानुगतिक न बनता विचार व चिकित्सा करून भक्ती करावी. अंधानुकरण करू नये.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | २०:०९:३८ |
| २५ जून २०२६ | नक्षत्र:स्वाती १६:२८:५८ |
| गुरुवार | योग:शिव १०:५३:०६ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:वणिज ०७:०८:३६ |
| निज ज्येष्ठ शके | करण:विष्टि २०:०९:३८ |
| संवत्– १९४८ | सूर्य:मिथुन |
| संवत्सर – पराभवनाम | चन्द्र:तुला |
| अयन– दक्षिणयन | हिजरी सन् – १४४८ |
| मास– निज ज्येष्ठ | मुस्लिम मास – मोहरम |
| ऋतु– हेमंत | तारीख – ९ |
| शुक्ल पक्ष | विशेष |
| तिथि:एकादशी | निर्जला एकादशई |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ९९१

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | 2 | 5 | | | | 1 | | 4 |
| | | | 8 | | 9 | 5 | | 6 |
| | 3 | | 1 | 5 | 4 | 9 | | |
| | | | | | | 8 | 4 | |
| 1 | | | 7 | | 8 | | | 5 |
| | 5 | 6 | | | | | | |
| | | 1 | 3 | 4 | 5 | | 9 | |
| 7 | | 9 | 2 | | 6 | | | |
| 5 | | 3 | | | | 6 | 1 | 2 |

### : सूडोकु :

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. ९९० चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 2 | 5 | 1 | 8 | 6 | 7 | 9 | 3 |
| 6 | 8 | 1 | 7 | 9 | 3 | 5 | 2 | 4 |
| 7 | 9 | 3 | 5 | 2 | 4 | 1 | 8 | 6 |
| 2 | 4 | 9 | 6 | 1 | 5 | 8 | 3 | 7 |
| 1 | 7 | 8 | 3 | 4 | 2 | 9 | 6 | 5 |
| 5 | 3 | 6 | 8 | 7 | 9 | 2 | 4 | 1 |
| 3 | 6 | 7 | 9 | 5 | 8 | 4 | 1 | 2 |
| 8 | 5 | 2 | 4 | 3 | 1 | 6 | 7 | 9 |
| 9 | 1 | 4 | 2 | 6 | 7 | 3 | 5 | 8 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १९०९ – जॉर्ज सर्जंट याने यूएस ओपन गोल्फ स्पर्धा जिंकली.
- १९६१ – इराकने कुवेतला चे भाग म्हणून घोषित केले.

### राष्ट्रीय

- १९७५ – भारताचे राष्ट्रपती फक्रुद्दीन अली अहमद यांनी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या शिफरसीवरून देशात अंतर्गत आणिबाणी जाहिर केली.
- १९८३ – क्रिकेट विश्वकरंडक स्पर्धेत वेस्ट इंडिजचा पराभव करून भारत विजेता.
- २००७ – भारताने आंतरराष्ट्रीय कसोटी क्रिकेटमध्ये आपले ७५ वर्षे पूर्ण केले.
- २००८ – परराष्ट्र व्यवहार मंत्री प्रणव मुखर्जी यांच्या हस्ते राष्ट्रपती प्रतिभा पाटील यांना पहिला ई–पासपोर्ट देऊन केंद्र सरकारचा महत्त्वाकांक्षी ई–पासपोर्ट योजनेचा शुभारंभ झाला.
- २००८ – शिर्डीपासून १५ किलोमीटर अंतरावर असलेल्या मौजे काकडी (ता.कोपरगाव जि. अहमदनगर) येथे २६४ कोटी रुपयांची गुंतवणूक करुन विमानतळाच्या उभारणी–विकासासाठी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित यांना विशेष हेतू कंपनी म्हणून मान्यता देण्यात आली.

### जन्म

- १९३१ – भारताचे सातवे पंतप्रधान विश्वनाथ प्रताप सिंग (व्ही. पी.सिंग) यांचा जन्म.

### निधन

- १८७६ – अमेरिकी सैनिक जॉर्ज आर्मस्ट्राँग कस्टर याचे निधन.
- १९७१ – स्कॉटिश जीवशास्त्रज्ञ जॉन बॉयड ऑर यांचे निधन.

## : SMS :

Zindagi Mei Race
Kabhi Mat lagana.
Why?
Kyun k aapka naam
change ho sakta hai.
But How?
Because Jo Jeeta
wohi "Sikandar"..

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३५.३ | २५.७ |
| अहमदनगर | ३३.९ | २४.३ |
| अकोला | ४०.७ | २५.२ |
| अमरावती | ३९.७ | २५.५ |
| बीड | ४०.४ | ३१.१ |
| भंडारा | ४०.४ | ३१.४ |
| बुलढाणा | ४१.६ | २९ |
| चंद्रपूर | ४०.२ | ३१.८ |
| चेन्नई | ४२ | ३१.७ |
| नवी दिल्ली | ४१.३ | ३१.६ |
| धुळे | ३८.८ | २९.२ |
| गोंदिया | ३७.२ | ३०.९ |
| जळगाव | ३९.३ | २५.८ |
| कोल्हापूर | २६.५ | २२.६ |
| लातूर | ३५.८ | २६.२ |
| मुंबई | ३४.३ | २७.६ |
| नागपूर | ३९.६ | २९.१ |
| नांदेड | ३८.८ | २७ |
| नंदूरबार | ३५.४ | २६.६ |
| नाशिक | ३२.९ | २४.३ |
| पुणे | २५.९ | २२.७ |
| पंढरपूर | ३५.५ | २५.९ |
| सातारा | २९.५ | २२.३ |
| सांगली | ३१ | २३.७ |
| सोलापूर | ३६.३ | २६.६ |
| वर्धा | ३९.२ | २७.३ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग : गुलाबी, शुभ दिशा : पूर्व राजकीय कामे हातावेगळी होतील. उपयुक्त सल्ला मिळेल.

**तुळ :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:दक्षिण शांत व विवेक बुद्धीने काम केल्यास यश मिळेल. आर्थिक स्थिती चांगली राहील.

**वृषभ :** शुभ रंग:पांढरा,शुभ दिशा: पूर्व वाद विवाद किंवा भांडणामुळे आपले मानसिक संतुलन बिघडेल. व्यापार मध्यम राहील.

**वृश्चिक :** शुभ रंग:निळा, शुभ दिशा:उत्तर कार्याचा विस्तार वाढून अनुकूल परिस्थिती निर्माण होईल. काही महत्वपूर्ण निर्णय घ्याल.

**मिथुन :** शुभ रंग–केसरी, शुभ दिशा:पूर्व मनात अशांती असल्या कारणाने आपल्याला संकटाचा सामना करावा लागेल.

**धनु :** शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा:दक्षिण कुटुंबात मोठ्यांचे मार्गदर्शन मिळेल. कायद्यातील वादाचा निपटारा होईल. आर्थिक योग उत्तम आहेत.

**कर्क :** शुभ रंग,पांढरा, शुभ दिशा:पूर्व न्यायालयीन कामात यश मिळेल. व्यापारात नुकसान होण्याचे योग आहेत.

**मकर :** शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:उत्तर व्यवसायात फायदा होईल त्यामुळे मन प्रसन्न राहील. चांगल्या बातम्या ऐकण्यास मिळतील.

**सिंह :** शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:पूर्व आपल्या बुद्धीच्या जोरावर आखलेल्या योजना यशस्वी होतील.

**कुंभ :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:उत्तर सामाजिक मान सन्मान मिळाल्याने आनंदी राहील. व्यापारात नवीन संबंध फायदेशीर ठरतील.

**कन्या :** शुभ रंग:काळा, शुभ दिशा: उत्तर प्रभावशाली व्यक्तित्वामुळे आपल्या गोष्टी लोकांपर्यंत पोहचविण्यात यशस्वी व्हाल.

**मीन :** शुभ रंग : पिवळा,शुभ दिशा:उत्तर कौटुंबिक किंवा मालमत्ते विषयाच्या समस्या दूर होतील. पराक्रमामुळे विरोधक त्रस्त होतील. कर्ज घेण्यापासून दूर रहा.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ९९१



**आडवे शब्द**

१. आपले राष्ट्रगीत
६. व्याकूळ
८. राजाचा कालावधी, कारकीर्द
१०. कपोल
११. सूट
१३. निराश, उदास
१४. अवघा, सगळा
१६. तारकांचा स्वामी, चंद्र
१८. मार्गक्रमण
२०. गुणाकारच्या विरुद्ध
२२. छडीचा पातळ बांबू
२३. मौल्यवान अथवा अल्पमोली रत्न
२४. मुंगी झाल्यास हिची गोडी चाखता येणार!
२६. वाकडा नसलेला
२८. होकारच्या विरुद्ध
३०. आंबट पानांची भाजी
३१. संगीतातील पहाटे म्हणण्याचा एक राग
३३. सैन्याची तुकडी
३४. नट्टपट्टा
३६. देऊळ
३८. कोवळा अंकुर
४०. अक्कलशून्य
४१. सत्ता भोगणारा
४३. पूज्य पण गणितातील नव्हे!
४५. भरभराट
४८. शर्त, अट
४९. जन्मदाता, निर्माता
५१. मरूभूमी
५२. बगळा
५३. भांडण, वैर
५५. महान
५७. ढग फुटीमुळे उद्ध्वस्त झालेला प्रदेश
५८. गाणारा
५९. गजाननमहाराजांच्या समाधीचे गाव
६१. प्रतिस्पर्धी
६२. किंमत
६३. एकटा
६५. सुबक अक्षर
६७. चटकन
६९. कावकाव करणारा
७०. नवरदेव
७१. पुण्याचा रहिवासी
७२. लख्ख गोरा
७४. ताठा, नखरा
७५. बाळभाषेत पाणी
७६. पुष्कळ
७७. पुण्याचे
७९. फिकीर, काळजी
८१. बहुतेक, नजीकचे
८३. तलवारीबरोबरचे अस्त्र
८४. सारखेपणा, साम्य
८५. अरण्य
८६. गमन करणे

**उभे शब्द**

१. एक मोठे चर्मवाद्य
३. विटीदांडूच्या खेळातील खड्डा
४. चामखीळ
५. नूतन
६. संध्याकाळ
७. डोक्यावर मायेचे छत्र असलेला
८. राजमहाल
९. वयानुसार वाढणारा डोक्यावरील अर्धचंद्र
१२. वेल
१४. वर्षानुवर्षे
१५. धोतराचा पायघोळ भाग
१७. विडा रंगवणारा
१९. भुगा
२०. आपला देश
२१. आवड, रुची
२३. गाढव (संस्कृत)
२५. दाणे वगैरे कुटण्याचे जोडसाधन
२७. आयुर्वेदीय भाषते 'टॉनिक'
२८. नाकावरील मोत्याचा दागिना
२९. उंच उडीसाठी एकावर एक चढवले जाणारे अडथळे
३२. मत्सर
३३. पळून जाणे
३५. पाषाण
३६. राष्ट्र
३७. तांडा घेऊन भटकणारी व्यापारी जमात
३९. खोडण्याचे, बांधण्याचे चिवट साधन
४१. अखेरीस
४२. धैर्य
४४. झोप, निद्रा
४६. तोफगाडी, चिलखती वाहन
४७. पूजेचे ताट
४८. परभारे
५०. पार्थिव
५४. आकाशात ढगांची गर्दी असे वातावरण
५६. बाहेर काढणे
६०. निरर्थक भटकंती
६२. झुणक्याबरोबर गोड लागणारी
६३. आश्रय, आधार (हिंदी)
६४. केलेल्या कार्यावर पाणी ओतणे
६६. दरवाजा
६८. घुबड
६९. कर्ण
७१. प्राचीन, जुने
७२. गाई सांभाळणारा श्रीकृष्ण
७३. पदर
७५. पवित्र
७७. महाराष्ट्राचे लाडके व्यक्तीमत्त्व
७८. अस्वल
८०. आई
८१. थोडे वृद्धत्व?
८२. सततचे नामस्मरण

**जम्बो शब्दकोडे क्र. ९९० चे उत्तर**

आडवे उत्तर : १.पोटगी ३.कचकच ६.सुधाकर ९.काक ११.ताठर १२.डमडम १३.मासला १४.टक १६.परवचा १७.नवल १८.भान १९.पाचारणे २३.किस्मत २५.सरपण २७.हिरा २८.समा २९.रवाळ ३१.पायजमा ३२.हनन ३४.मरणयातना ३७.लहानसा ३९.कच ४१.तरतरीत ४३.मदपाक ४३अ.व ४४.वारकरी ४७.कस ४९.भार ५०.सामना ५२अ.दंडगोल ५४.शपथपूर्वक ५७.रग ५८.गर ५९.मखर ६१.रत ६३.राग ६५.पोक ६७.समतल ७०.मळकट ७१.कराल ७२अ.लाट ७३.मदत ७४.कच्चा ७५.मगरमिठी ७७.सखा ७८.सजावट ७९.सतत ८०.भुईसपाट

उभे उत्तर : १.पोपट २.गीता ३.करपणे ४.कडवट ५.चमचा ६.सुमन ७.कमालकिमान ८.रस १०.कर्दनकाळ १५.कपार २०.चापबाण २१.रण २२.मारा २४.तर २५.सक्षम २६.नायनाट २७.हिमालय २८.सहसा ३०.वाटेकरी ३१.पात ३३.नगर ३५.रसद ३६.याचक ३८.नजर ४०.चतकोर ४१.तरी ४२.तप ४३.मुझसा ४४.वास ४५.कळप ४६.वादंग ४७.कलम ४८.अपूर्व ४९.भाकर ५१.मरगळ ५२.नाग ५३.डरपोक ५४.शरम ६०.खस ६२.तळतळाट ६३.रामदास ६४.कटकट ६६.करामत ६८.तलाठी ६८अ.लट ६९.हमखास ७२.लगत ७६.मित्र ७७.सई

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### पालखी मार्गाची उपमहापौर परशुराम वाडेकर यांच्याकडून पूर्वपाहणी

पुणे (दैनिक संध्या) : संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर पालखी मार्गाची पूर्वपाहणी पुणे महानगरपालिकेचे उपमहापौर परशुराम वाडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. बोपोडी मेट्रो स्थानकापासून या पाहणी दौऱ्याला प्रारंभ झाला. या पाहणी दौऱ्यात माजी नगरसेवक आनंद छाजेड, नगरसेवक भक्ती गायकवाड, औंध-बाणेर क्षेत्रीय कार्यालयाच्या प्रभाग समिती अध्यक्षा रोहिणी चिमटे, पथ विभागाचे अधीक्षक अभियंता राजेश बनकर, मलनिःसारण विभागाचे अधीक्षक अभियंता हरीभक्त, औंध-बाणेर क्षेत्रीय कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त विजय नायकल, घोले रोड क्षेत्रीय कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त बाळासाहेब ढवले पाटील, क्षेत्रीय वैद्यकीय अधिकारी प्रेमलता घाटे, विभागीय आरोग्य अधिकारी पखाले, उपअभियंते दीपक लांडे व डॉ. बढीये, वरिष्ठ आरोग्य निरीक्षक विजय भोईर व कांबळे, औंध पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक केंद्रे तसेच विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. पालखी मार्गावरील स्वच्छता, रस्त्यांची स्थिती, मलनिःसारण व्यवस्था, आरोग्य सुविधा, वाहतूक व्यवस्थापन तसेच भाविकांसाठी उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या विविध नागरी सुविधांची सविस्तर पाहणी करण्यात आली. संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना आवश्यक उपाययोजना तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना उपमहापौर वाडेकर यांनी दिल्या. पालखी सोहळा सुरळीत, सुरक्षित आणि नियोजनबद्ध पद्धतीने पार पडण्यासाठी सर्व विभागांनी परस्पर समन्वयाने कार्य करावे तसेच भाविकांना कोणत्याही प्रकारची गैरसोय होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

### नेक्सस वेस्टएंड मॉल आणि द पॅव्हेलियनतर्फे एंड ऑफ सॅडनेस सेलचे आयोजन



पुणे (दैनिक संध्या) : यंदाच्या हंगामात, 'नेक्सस वेस्टएंड मॉल' आणि 'द पॅव्हेलियन, पुणे' यांच्यातर्फे 'एंड ऑफ सॅडनेस सेल' सुरू करून रोजच्या आनंदाचे क्षण साजरे करण्यात येत असून, पुणेकरांना यात सहभागी होण्याचे आमंत्रण देण्यात येत आहे. लोक मॉलमध्ये फक्त खरेदी करण्यासाठीच येत नाहीत. ते मैलाचे टप्पे साजरे करण्यासाठी, मित्रांना भेटण्यासाठी, कुटुंबासोबत वेळ घालवण्यासाठी, आठवणी निर्माण करण्यासाठी, नवीन अनुभव घेण्यासाठी आणि अनेकदा फक्त आपले मन हलके करण्यासाठी किंवा प्रसन्न वाटण्यासाठी येतात. आपण सगळेच कधी ना कधी अशा परिस्थितीतून गेलो आहोत. कामातील एखादा वाईट दिवस, रद्द झालेला बेत, एखादा निराशाजनक निकाल, हुकलेली संधी किंवा फक्त असा एखादा दिवस जेव्हा काहीच आपल्या मनासारखे होत नाही. आयुष्य आपल्याला नाराज होण्याची अनेक कारणे देत असले, तरी 'नेक्सस वेस्टएंड मॉल' आणि 'द पॅव्हेलियन, पुणे' तुम्हाला यातून बाहेर पडण्याचे असंख्य मार्गदेखील देतात; मग ते मित्रांसोबतचे जेवण असो, चित्रपट असो, कुटुंबासोबत घालवलेला दर्जेदार वेळ असो. फॅशन, सौंदर्य प्रसाधने, इलेक्ट्रॉनिक्स, डायनिंग, मनोरंजन आणि लाइफस्टाइल ब्रँड्सवर उत्कृष्ट ऑफर्ससह, हा 'एंड ऑफ सॅडनेस सेल' ग्राहकांना आयुष्यातील छोट्या-छोट्या निराशा बाजूला सारून चेहऱ्यावर हसू आणणाऱ्या अनुभवांचा आनंद घेण्यास प्रोत्साहित करतो. २२ जूनपासून 'नेक्सस वेस्टएंड मॉल' आणि 'द पॅव्हेलियन, पुणे' येथे ग्राहक 'शॉपर्स स्टॉप', 'लेव्हीज', 'आदिदास' आदी आघाडीच्या ब्रँड्सवर ५० टक्क्यांपर्यंतच्या आकर्षक ऑफर्स आणि सवलतींचा लाभ घेऊ शकतात.

### प्रस्तावित अपर तहसिलदार कार्यालय चाकणच्या हरकती सादर करण्याचे आवाहन

पुणे (दैनिक संध्या) : महसूल व वन विभागाच्या आदेशानुसार प्रस्तावित अपर तहसिलदार कार्यालय चाकणबाबत नागरिकांनी आपल्या हरकती व सूचना उपविभागीय अधिकारी खेड, उपविभाग खेड (राजगुरुनगर), पाण्याच्या टाकीजवळ, वाडा रोड, राजगुरुनगर, ता. खेड यांच्या कार्यालयाकडे 8 जुलै 2026 पर्यंत सादर करावे, असे आवाहन खेडचे उपविभागीय अधिकारी अनिल दौंडे यांनी केले आहे. प्रस्तावित अपर तहसिलदार कार्यालय चाकणच्या कार्यक्षेत्रात चाकण,आळंदी, पिंपळगाव ता. खेड, करंजविहीरे, तसेच तहसिलदार कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात राजगुरुनगर, वेताळे, कन्हेरसर पाईट, वाडा आणि कडे बु. अशी महसूल मंडळे आहेत. प्रस्तावित अपर तहसीलदार कार्यालय आणि तहसील कार्यालय खेडमधील दोन्ही महसूल मंडळे मिळून 11 महसूल मंडळे आहेत. तसेच प्रस्तावित तहसीलदार कार्यालयाचे मुख्यालय चाकण, तालुका खेड आणि जिल्हा पुणे असणार आहे, अशी माहिती श्री. दौंडे यांनी दिली आहे.

### प्रलंबित आधार अर्ज तातडीने निकाली काढण्याचे जिल्हाधिकारी यांचे निर्देश

पुणे (दैनिक संध्या) : जिल्ह्यातील आधार नोंदणी व अद्ययावतीकरण प्रक्रियेचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय आधार नियंत्रण समितीची बैठक नुकतीच जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली. यावेळी प्रलंबित अर्जांचा निपटारा, विद्यार्थ्यांचे बायोमेट्रिक अद्ययावतीकरण आणि आधार सेवांमधील विविध सुधारणांबाबत चर्चा करण्यात आली. जिल्हाधिकारी डुडी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीस समितीचे सदस्य, उपजिल्हाधिकारी तथा आधार नोडल अधिकारी, सदस्य सचिव तहसीलदार संजय गांधी योजना शाखा तथा सहायक नोडल अधिकारी (आधार) आणि इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते. बैठकीत आधार नोंदणी व अद्ययावतीकरणाशी संबंधित विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. 'स्टेट पोर्टल'वरील ९० दिवसांपेक्षा अधिक कालावधीपासून प्रलंबित असलेले अर्ज तातडीने निकाली काढण्याच्या सूचना देण्यात आल्या. शालेय विद्यार्थ्यांमध्ये आधार माहिती अद्ययावत राहावी यासाठी ५ ते १५ वर्षे आणि १५ ते १७ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांचे अनिवार्य बायोमेट्रिक अद्ययावतीकरण शिबिर मोहिमेच्या स्वरूपात आयोजित करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच आधारसंदर्भातील तक्रार निवारण प्रक्रियेचाही आढावा घेण्यात आला. आधार नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रांबाबत करण्यात आलेल्या बदलांची माहिती यावेळी देण्यात आली. यामध्ये परदेशी नागरिकांच्या ईएफआरओ (eFRO) कागदपत्रांतील बदल, घटस्फोट प्रकरणात नाव बदलासाठी छायाचित्राशिवाय Divorce Decree स्वीकारणे तसेच विवाहानंतर महिलांच्या आधार कार्डावरील जन्मतारीख दुरुस्तीसाठी जन्म दाखला आणि विवाह दाखला ग्राह्य धरणे यांचा समावेश आहे. याशिवाय, mAadhaar App च्या माध्यमातून ई-मेल अद्ययावत करण्याची सुविधा विनामूल्य उपलब्ध असल्याची माहितीही बैठकीत देण्यात आली. बैठकीत आधार सेवा अधिक प्रभावी, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख करण्यासाठी विविध उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली.

# इतिहासातून पर्यावरण संवर्धनाची प्रेरणा घेण्याची गरज

## प्र. के. घाणेकर : वनराई आणि इतिहास प्रबोधन समितीच्या संयुक्त उपक्रमात 'इतिहासातील पर्यावरण' विषयावर व्याख्यान

पुणे (दै. संध्या)



पर्यावरण संवर्धनासाठी केवळ वर्तमानातील उपाययोजनांवर अवलंबून न राहता इतिहासातील पर्यावरणविषयक जाण, परंपरा आणि अनुभवांमधून प्रेरणा घेण्याची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन वनस्पतीशास्त्रज्ञ, दुर्ग व इतिहास अभ्यासक प्र. के. घाणेकर यांनी केले. जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधत वनराई आणि इतिहास प्रबोधन समिती, महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'इतिहासातील पर्यावरण' या विषयावरील विशेष व्याख्यानात ते बोलत होते. हा कार्यक्रम स्वा. सावरकर अध्यासन केंद्र, डेक्कन येथे पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वनराईचे विश्वस्त सागर धारिया होते. नगरसेविका डॉ. प्रा. निवेदिता एकबोटे आणि पल्लवी जावळे या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. पियुष शहा, डॉ. दिलीप शेठ, यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमावेळी पर्यावरण क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल डॉ. गुरुदास नूलकर यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अमित वाडेकर यांनी केले तर सूत्रसंचालन आणि आभार सौरभ कर्डे यांनी मानले.

प्र. के. घाणेकर यांनी इतिहास आणि पर्यावरण या संकल्पनांचा उलगडा करताना पर्यावरण म्हणजे आपल्या अवतीभोवती असलेले सजीव-निर्जीव जग असल्याचे सांगितले. शहर, ग्रामीण भाग, जंगल आणि किल्ल्यांचे पर्यावरण वेगवेगळे असते. महाराष्ट्रातील किल्ल्यांवर आढळणारी जैवविविधता, भूवैज्ञानिक वैशिष्ट्ये आणि स्थानिक परिसंस्थांचे महत्त्व त्यांनी उदाहरणांसह स्पष्ट केले. राजगड परिसरात आढळणाऱ्या दुर्मिळ 'डे गेको' प्रजातीचा उल्लेख करत त्यांनी ऐतिहासिक वारसा आणि नैसर्गिक वारसा यांचे अतूट नाते अधोरेखित केले.

अध्यक्षीय भाषणात सागर धारिया यांनी पर्यावरणीय बदलांची चिंताजनक आकडेवारी मांडली. १९५० च्या दशकात १० ते १२ मीटर खोलीवर उपलब्ध असलेले भूजल अनेक ठिकाणी ५० ते ३५० मीटरपर्यंत खाली गेल्याचे त्यांनी सांगितले. वनक्षेत्र वाढल्याचे दिसत असले तरी नैसर्गिक जैवविविधतेच्या परिसंस्था कमी होत असल्याकडे त्यांनी लक्ष वेधले. तसेच देशातील ४० टक्क्यांहून अधिक पाणथळ क्षेत्रे नष्ट झाल्याचे त्यांनी नमूद केले.

पावसाचे प्रमाण जवळपास समान असले तरी पावसाचे दिवस मोठ्या प्रमाणात कमी झाल्याने कमी कालावधीत अतिवृष्टी होत असून त्याचा पर्यावरण आणि शेतीवर विपरीत परिणाम होत असल्याचे धारिया यांनी सांगितले. वाढते शहरीकरण, प्लास्टिक कचरा आणि बदलती जीवनशैली ही भविष्यातील मोठी आव्हाने असल्याचे त्यांनी नमूद केले. प्रत्येक नागरिकाने आपल्या परिसरात पर्यावरणपूरक तीन सकारात्मक सवयी अंगीकारून बदलाची सुरुवात करावी, असे आवाहन त्यांनी केले.

प्रास्ताविकात अमित वाडेकर यांनी महाराष्ट्राच्या संतपरंपरेत आणि ऐतिहासिक वारशात पर्यावरण संवर्धनाची समृद्ध परंपरा असल्याचे सांगितले. संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर, संत सावता माळी यांच्या विचारांपासून ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या आज्ञापत्रांपर्यंत तसेच अहिल्याबाई होळकर आणि पेशवेकालीन जलव्यवस्थापनापर्यंत अनेक उदाहरणांतून पर्यावरण संरक्षणाची प्रेरणा मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमास पर्यावरणप्रेमी, इतिहास अभ्यासक, विद्यार्थी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. इतिहास आणि पर्यावरण यांचा परस्परसंबंध उलगडून सांगणाऱ्या या व्याख्यानाला उपस्थितांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

## राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम २८ जून रोजी

पुणे (दै. संध्या)

■ पुणे जिल्ह्यात ४ लाख ५३ हजारांहून अधिक बालकांना पोलिओचे डोस देणार

राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेंतर्गत रविवार, दिनांक २८ जून २०२६ रोजी पुणे जिल्ह्यात एकाच दिवशी विशेष पोलिओ लसीकरण मोहीम राबविण्यात येणार असून ० ते ५ वर्षे वयोगटातील ४ लाख ५३ हजार ५१० बालकांना पोलिओ प्रतिबंधक लसीचे डोस देण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे, अशी माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद पुणे यांनी दिली. पोलिओ हा मानवाच्या शारीरिक स्थितीवर तसेच समाजाच्या आर्थिक विकासावर परिणाम करणारा अत्यंत गंभीर आजार आहे. या आजारामुळे बालकांना कायमस्वरूपी अपंगत्व येऊ शकते तसेच काही प्रसंगी मृत्यूही होऊ शकतो. अपंगत्वामुळे संबंधित व्यक्तीचे जीवन परावलंबी बनते. त्यामुळे पोलिओचे समूळ उच्चाटन करण्याचे उद्दिष्ट जागतिक आरोग्य संघटनेने निश्चित केले असून त्यानुसार भारतात सन १९९५ पासून राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहीम राबविण्यात येत आहे. अचानक आलेल्या अपंगत्वाचे (० ते १५ वर्षे वयोगटातील मुलांमधील) सर्वेक्षण आणि मॉप-अप मोहिमांच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे देशातील पोलिओ रुग्णांची संख्या सातत्याने घटली आहे.

## कलाकारांनी त्यांच्या आयुष्यातील 'सुपरहिरो' वडिलांना केला खास सलाम

पुणे (दै. संध्या)



'पापा', 'डॅड', 'फादर', 'बाबा'... हे केवळ शब्द नाहीत, तर त्या नात्यातील भावना आणि निःस्वार्थ प्रेमाची जाणीव करून देणारे आहेत. वडील हे प्रत्येक मुलासाठी आयुष्यातील सर्वांत मजबूत आधारस्तंभ असतात. ते शांतपणे कुटुंबाचे रक्षण करतात, मुलांना सुरक्षित ठेवतात आणि त्यांना योग्य दिशा देतात. त्यांच्या कठोर वाटणाऱ्या स्वभावामागे मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठीचा प्रामाणिक प्रयत्न दडलेला असतो.

फादर्स डे निमित्त झी टीव्हीवरील अनेक लोकप्रिय कलाकारांनी त्यांच्या आयुष्यातील या 'सुपरहिरो' व्यक्तीला भावनिक शब्दांत सलाम केला. 'दिलों की राम लीला'मधील ईजाज खान, 'तू ही रे दिल में'मधील अब्रार काझी, 'गंगा माई की बेटियाँ'मधील अमनदीप सिधू, 'तुम से तुम तक'मधील निहारिका चौक्सी, 'जगद्धात्री'मधील सोनाक्षी बत्रा, 'लक्ष्मी निवास'मधील मानसी जोशी रॉय, 'वसुधा'मधील अभिषेक शर्मा, 'जाने अनजाने हम मिले'मधील भरत अहलावत आणि 'सरू'मधील मोहक मटकर यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

ईजाज खान म्हणाला की, त्याचे वडील त्याच्या आयुष्यातील सर्वांत मोठी प्रेरणा आहेत. त्यांच्या संस्कारांमुळेच तो आज जे काही आहे ते बनू शकला. सिंगल फादर म्हणून त्यांनी केलेल्या संघर्षाची आठवण करून देत ईजाजने त्यांच्या चेहऱ्यावर हास्य आणणे हेच आपले ध्येय असल्याचे सांगितले.

अब्रार काझीने आपल्या वडिलांच्या आठवणींना उजाळा देत सांगितले की, ते आज त्याच्यासोबत नसले तरी त्यांचे आशीर्वाद नेहमी सोबत असल्याची भावना त्याला ताकद देते.

अमनदीप सिधूने आपल्या वडिलांनी दिलेल्या सुरक्षिततेची आणि आत्मविश्वासाची जाणीव व्यक्त करत सांगितले की, त्यांच्या पाठिंब्यामुळेच ती निर्भयपणे स्वप्ने पाहू शकली.

निहारिका चौक्सीने आपल्या वडिलांना खरे 'सुपरहिरो' संबोधत, त्यांच्या उपस्थितीमुळे आयुष्यातील प्रत्येक संकटावर मात करण्याची ताकद मिळते असे म्हटले.

सोनाक्षी बत्राने आपल्या वडिलांचे वर्णन 'पार्टनर इन क्राइम' असे करत त्यांच्या त्याग आणि प्रेमाची आठवण करून दिली.

मानसी जोशी रॉयने दिवंगत वडील अरविंद जोशी यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करत त्यांच्या आठवणींना उजाळा दिला.

अभिषेक शर्माने सांगितले की, त्याचे वडील त्याचे आदर्श आहेत आणि त्यांच्या सारखा माणूस बनणे हेच त्याचे खरे यश आहे.

भरत अहलावतने वडिलांकडून मिळालेल्या मूल्यांचा उल्लेख करत त्यांच्या जीवनशैलीतून शिकण्यावर भर दिला.

मोहक मटकरने सांगितले की, वडील हे आपल्या आयुष्यातील शांत शक्ती असतात, जे नेहमी पाठिंबा देत राहतात.

# सोनाक्षी बत्राचा आगामी कथानकाबाबत खुलासा

पुणे (दै. संध्या)



झी टीव्हीवरील लोकप्रिय मालिका 'जगद्धात्री' सध्या प्रेक्षकांच्या पसंतीस उतरत असून तिच्या कथानकातील नव्या वळणांमुळे उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. जगद्धात्री आणि शिवाय यांच्या नात्याभोवती निर्माण झालेल्या प्रश्नांमुळे मालिकेत मोठे नाट्य रंगताना दिसत आहे. अशातच अभिनेत्री सोनाक्षी बत्रा हिने आगामी भागांबाबत मोठा खुलासा केला आहे.

मालिकेच्या अलीकडील भागांमध्ये देशमुख आणि नाईक कुटुंबीयांनी जगद्धात्री आणि शिवाय यांच्या नात्यावर प्रश्न उपस्थित केले आहेत. मात्र आजी आणि माया यांनी दोघांच्या बाजूने उभे राहत त्यांना पाठिंबा दिला. इतकेच नव्हे तर मायाने सर्वांसमोर त्यांचे लग्न लावून देण्याचा निर्णय घेतल्याने कथानकाला नवे वळण मिळाले आहे.

याबाबत बोलताना सोनाक्षी बत्रा म्हणाली, "प्रेक्षकांनी आतापर्यंत शिवाय आणि जगद्धात्रीच्या नात्याभोवतीचे नाट्य पाहिले आहे. मात्र पुढे जे घडणार आहे ते याहूनही अधिक रोमांचक असेल. जगद्धात्रीच्या आयुष्यात एक मोठा ट्विस्ट येणार असून तो तिचे संपूर्ण आयुष्य बदलून टाकेल. ती अशा परिस्थितींमध्ये अडकणार आहे, ज्या प्रेक्षकांनी यापूर्वी कधीच पाहिलेल्या नाहीत."

तिने पुढे सांगितले की, आगामी भागांमध्ये भावनांचा, संघर्षाचा आणि आश्चर्याचा जबरदस्त संगम पाहायला मिळणार आहे. "आमच्या प्रेक्षकांनी मालिकेवर भरभरून प्रेम केले आहे. हे नवीन ट्विस्ट्स म्हणजे त्यांच्यासाठी आमच्याकडून खास भेट आहे. प्रत्येक नवीन घडामोड प्रेक्षकांची उत्सुकता वाढवत राहील," असेही ती म्हणाली.

दरम्यान, जगद्धात्री आणि शिवाय सध्या कठीण परिस्थितीत अडकले आहेत. कुटुंबियांच्या विरोधानंतर ते दोघे लग्नाचा निर्णय घेतील का? शिवाय जगद्धात्रीला माफ करेल का? या प्रश्नांची उत्तरे आगामी भागांत मिळणार आहेत.

'जगद्धात्री'मधील हे नवे ट्विस्ट्स पाहण्यासाठी प्रेक्षकांना मात्र पुढील भागांची प्रतीक्षा करावी लागणार आहे. ही मालिका दररोज रात्री १० वाजता झी टीव्हीवर प्रसारित होते.

## वाईजलाइफने आंतरराष्ट्रीय योग दिनाला दिले नवे रूप

पुणे (दै. संध्या)

■ देशातील अनपेक्षित ठिकाणी पोहोचवला योगाचा संदेश



आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त देशभरातील हजारो नागरिक उद्याने, स्टुडिओ आणि वेलनेस केंद्रांमध्ये एकत्र येऊन योगाभ्यास करत असताना, वेलनेस ब्रँड वाईजलाइफने एक वेगळा मार्ग निवडला. 'जस्ट अनरोल' (Just Unroll) या देशव्यापी मोहिमेअंतर्गत ब्रँडने योगाचा संदेश भारतातील काही अनपेक्षित ठिकाणी पोहोचवला. चांदणी चौकातील गजबजलेल्या रस्त्यांपासून ते गर्दीच्या रेल्वे स्थानकांपर्यंत, नाईटलाइफ क्षेत्रे, धार्मिक स्थळे, ऐतिहासिक वारसा स्थळे आणि यमुनेच्या तीरापर्यंत योग सत्रांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमातून एकच संदेश देण्यात आला—योग कुठेही करता येऊ शकतो.

## व्हिक्टोरियाज सिक्रेटतर्फे पुण्यात नवीन दालनाचा शुभारंभ


पुणे (दै. संध्या)



आधुनिकता त्याचबरोबर फॅशनच्या संकल्पनेवर आधारित अंतर्वस्त्रे, लाउंजवेअर, स्पोर्ट्स कलेक्शनची निर्मिती करणारी, उत्तम अत्तरे, बॉडी केअरसह 'व्हिक्टोरियाज सिक्रेट पिंक' कलेक्शनच्या माध्यमातून महिलांमध्ये आत्मविश्वास फुलविणारी, आनंद पसरविणारी आणि 'सेक्सी' व्यक्तिमत्व फुलविण्यासाठी प्रयत्नशील असणारी आघाडीची रिटेलर कंपनी 'व्हिक्टोरियाज सिक्रेट'ने भारतातील आपली ब्रँड ॲम्बेसेडर तृप्ती डिमरी हिचे पुण्यातील फिनिक्स एव्हेन्यू ऑफ स्टार्स या आपल्या नव्याने सुरू झालेल्या स्टोअरमध्ये भेटीच्या वेळी जोरदार स्वागत केले. भारतात महिला ग्राहकांमध्ये आपली लोकप्रियता आणखी उंचावण्यासाठी तृप्ती डिमरीची ही भेट ब्रँडसाठी अतिशय महत्त्वाचा टप्पा ठरली आहे. सांस्कृतिक भागीदारी आणि खरेदीच्या माध्यमातूम महिला ग्राहकांना भारावून टाकणाऱ्या अनुभवांतून त्यांच्याशी आपले नातेसुध्दा या भेटीमुळे अधिक दृढ केले आहे. पुण्यातील सर्वाधिक लोकप्रिय परिसरांपैकी एक असलेल्या विमान नगरमधील 'फिनिक्स मार्केटसिटी' शॉपिंग मॉलमध्ये हे स्टोअर सुरु करण्यात आलेले आहे. या स्टोअरची रचना अतिशय नाविन्यपूर्ण असून त्याची अनोखी मांडणी आणि सुटसुटीत रचना ग्राहकांना सहजपणे तिथे पोहोचण्यास मदत करते, तसेच खरेदीचा उत्तम आणि स्वागतार्ह अनुभव देते.

# स्पार्क बाय हिल्टन हॉटेल्स सुरू करण्याची घोषणा

पुणे (दै. संध्या)




हिल्टनने आज बेंगळुरू आणि गोवा येथे 'स्पार्क बाय हिल्टन' हॉटेल्स सुरू करण्याची घोषणा केली असून, या ब्रँडचे आशिया पॅसिफिकमध्ये आगमन झाले आहे. हे उद्घाटन हिल्टनच्या ऑलिव्ह हॉस्पिटॅलिटीसोबत देशभरात १५० 'स्पार्क बाय हिल्टन' हॉटेल्स सुरू करण्याच्या धोरणात्मक करारावर आधारित आहे.

भारतातील लाँचिंगसाठी, 'स्पार्क बाय हिल्टन' स्थानिक प्रवाशांच्या गरजा आणि अपेक्षा लक्षात घेऊन काळजीपूर्वक तयार करण्यात आले आहे. आराम, सोय आणि उत्कृष्ट अतिथी अनुभवांवर लक्ष केंद्रित ठेवत हा ब्रँड भारतीय बाजारपेठेसाठी स्वतःला कसे अनुकूल करू शकतो, हे यातून दिसून येते. मोफत नाश्त्याव्यतिरिक्त ज्यामध्ये खास 'डीआयवाय' डोसा स्टेशन्स असतील , नवीन 'स्पार्क बाय हिल्टन' हॉटेल्स प्रादेशिक सेवेचे पैलू सादर करतील, जसे की सेल्फ-सर्व्ह चाय- कार्ट , निवडक ठिकाणी जिम आणि इन-रूम डायनिंग यांसारख्या सुविधा, तसेच चार्जर, बॅटरी आणि स्नॅक्स यांसारख्या अत्यावश्यक वस्तू पुरवणारी वेंडिंग मशीन्स उपलब्ध असतील. यातील प्रत्येक सुविधा मुक्कामादरम्यान येणाऱ्या अडचणी कमी करण्यासाठी आणि प्रवाशांचा प्रवास अधिक सुकर करण्यासाठी डिझाइन करण्यात आली आहे. डिजिटल चेक-इन, डिजिटल की , सर्व्हिस रिक्वेस्ट सपोर्ट आणि हिल्टन ऑनर्स ॲप इंटिग्रेशन यांसारखी तंत्रज्ञान-सक्षम वैशिष्ट्ये पाहुण्यांना अधिक सुलभ अनुभव देण्यासाठी तयार केली गेली आहेत.

हिल्टनचे वरिष्ठ उपाध्यक्ष आणि प्रादेशिक प्रमुख (दक्षिण आशिया), जुबिन सक्सेना म्हणाले, "आधुनिक भारतीय प्रवासी झपाट्याने बदलत आहेत, ग्राहक आता अशा ब्रँडेड मुक्कामाचा शोध घेत आहेत जे गुणवत्ता, सुविधा आणि सुसंगतता प्रदान करतील. 'स्पार्क बाय हिल्टन' थेट ही गरज पूर्ण करते आणि ऑलिव्ह हॉस्पिटॅलिटीसोबतची आमची भागीदारी आम्हाला या बाजारपेठेला साजेशा वेगाने पुढे जाण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देते. या पहिल्या दोन उद्घाटनांसह, आम्ही असे उत्पादन सादर करत आहोत जे हिल्टनचे विश्वासार्ह सेवा मानक राखत आजच्या व्यावहारिक प्रवाशांच्या पसंतीस उतरेल."

हे उद्घाटन हिल्टन आणि ऑलिव्ह हॉस्पिटॅलिटीने भारतातील पहिल्या १० 'स्पार्क बाय हिल्टन' स्वाक्षऱ्यांच्या घोषणेनंतर झाले आहे. आगामी वर्षांत जयपूर, नाशिक, मथुरा, पुणे, राजकोट आणि हैदराबाद या प्रमुख व्यावसायिक आणि पर्यटन कॉरिडॉरमध्ये अतिरिक्त 'स्पार्क बाय हिल्टन' हॉटेल्स उघडण्याची अपेक्षा आहे.

'स्पार्क बाय हिल्टन' हॉटेल्स हे हिल्टनच्या २८ वेगवेगळ्या हॉटेल ब्रँड्ससाठी असलेल्या पुरस्कारप्राप्त अतिथी लॉयल्टी प्रोग्राम 'हिल्टन ऑनर्स' मध्ये सहभागी आहेत. जे हिल्टन ऑनर्स सदस्य थेट हिल्टनच्या पसंतीच्या चॅनेलद्वारे बुकिंग करतात त्यांना तत्काळ लाभ मिळतात, ज्यामध्ये लवचिक पॉइंट्स आणि मनी पेमेंट पर्याय, विशेष सदस्य सवलत आणि मोफत मानक वाय-फाय समाविष्ट आहे. सदस्यांना केवळ हिल्टन ऑनर्स मोबाईल अँपद्वारे उपलब्ध असलेल्या लोकप्रिय डिजिटल साधनांचाही आनंद घेता येतो, ज्यामध्ये डिजिटल चेक-इन, रूम निवड आणि डिजिटल की समाविष्ट आहे.

## मौजे भिमाशंकरवाडी, ता. खेड, जिल्हा पुणे येथील श्री. क्षेत्र भिमाशंकर आदर्श ग्राम प्रकल्प विकास आराखड्यानुसार स्थानिक ग्रामस्थांचे सन्मानपुर्वक पुनर्वसन करण्यासाठी भूसंपादन करणेबाबत भूसंपादन क्षेत्र खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने भूसंपादन करण्यासाठी जाहीर नोटीस

**उपविभागीय अधिकारी, खेड**
**उपविभाग, खेड (राजगुरूनगर)**
**क्र. सखल/भूसं/एस.आर./02/2026**
**राजगुरुनगर, दिनांक-19/06/2026**

ज्याअर्थी, संपादन मंडळ तथा कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग, पुणे यांनी पत्र क्र. सा.बा. (उ) विभाग/थीमाशंकरवाडी भूसंपादन प्रस्ताव/2026-27 दि 11/06/2026 अन्वये मौजे भिमाशंकरवाडी, ता. खेड, जिल्हा पुणे येथील श्री. क्षेत्र भिमाशंकर आदर्श ग्राम प्रकल्प विकास आराखड्यानुसार स्थानिक ग्रामस्थांचे सन्मानपुर्वक पुनर्वसन करण्यासाठी मौजे भिमाशंकरवाडी मधील गट क्रमांक 1 मधील 145000.00 चौ.मी. व सिटी सर्व्हे क्र 1 ते 105 मधील 19986.84 चौमी क्षेत्र जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने भूसंपादन करण्यासाठी प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी सो. पुणे यांचेकडे सादर केला आहे.

आणि ज्याअर्थी, मा. जिल्हाधिकारी, पुणे भूसंपादन (समन्वय शाखा) यांचे आदेश क्र. पीएलसी/सीआर/16/2026, दि. 15/06/2026 अन्वये सदर जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने भूसंपादन करण्यासाठी उपविभागीय अधिकारी खेड, ता. खेड, जि. पुणे यांची भूसंपादन अधिकारी म्हणून नियुक्ती केली असून उक्त प्रस्तावासंबधी शासन निर्णय दि. १२ मे, २०१५ शासन परिपत्रक, दि. २५ जानेवारी, २०१७ व त्यांचे अनुषंगिक इतर सर्व शुध्दीपत्रकानुसार खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने भूसंपादनाची कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत;

त्याअर्थी,

१. उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार मी, अनिल दौंडे, उपविभागीय अधिकारी, खेड उपविभाग, खेड (राजगुरूनगर) याद्वारे खालील अनुसूची-एक मध्ये नमूद खाजगी जमीन कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग, पुणे, यांचे नावे थेट खरेदी पध्दतीने संपादन करणेबाबत जाहीर नोटिस प्रसिद्ध करीत आहे.
२. प्रकल्पासाठी जमीन थेट खरेदी पद्धतीने संपादन करतांना, मोबदला निश्चितीकामी गठीत करणेत आलेल्या जिल्हास्तरीय समितीमार्फत नवीन भूसंपादन अधिनियम, 2013 मधील कलम 26 ते 30 व शेड्यूल-1 नुसार संबंधित जमिनीसाठी बाजारमुल्य दर व पुनर्वसन धोरणानुसार एकुण देय मोबदला निश्चित करण्यात येवून, शासन निर्णय दि 12 मे, 2015 नुसार एकुण परिगणित होणा-या एकूण देय मोबदला रकमेवर थेट खरेदी संमती अनुदान म्हणून अतिरिक्त २५% मोबदला निश्चित करण्यात येईल. तसेच मौजे भिमाशंकरवाडी, ता खेड, जि. पुणे येथील श्री. क्षेत्र भिमाशंकर आदर्श ग्राम प्रकल्प विकास आराखड्यानुसार सिटी सर्व्हे क्र 1 ते 105 मधील हितसंबंधित खातेदार/भूधारकांच्या संपादित होणा-या क्षेत्रानुसार पुनर्वसन धोरणानुसार त्यांचे सन्मानपुर्वक पुनर्वसन करणेत येईल.
३. संबंधित भूधारकांकडून शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे खाजगी जमीन वाटाघाटीद्वारे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग, पुणे यांच्या नावे खरेदी देण्यास स्वेच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेला मोबदला संपूर्णतः व अंतिमरित्या स्विकारण्यास तयार असल्याबाबतची संमती पत्रे (विकल्प) याद्वारे मागवित आहे.
४. संबंधित भूधारकांनी जाहीर नोटिस प्रसिद्ध झाल्यानंतर विहित नमुन्यातील संमती पत्रे (विकल्प) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग, पुणे यांचेकडे दाखल करावेत.
५. संमतीपत्राचा (विकल्प) विहित नमुना कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग, पुणे यांचे तसेच उपविभागीय अधिकारी खेड, उपविभाग खेड (राजगुरुनगर) यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध आहे.
६. सदर प्रकल्पासाठी निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्राच्या आराखड्याची प्रत उपविभागीय अधिकारी खेड, उपविभाग खेड (राजगुरूनगर) / कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग, पुणे यांच्या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत भूधारकांना किंवा हितसंबंधित व्यक्तींना तसेच जनतेच्या निरीक्षणासाठी खुली ठेवण्यात आली आहे.
७. या जाहीर नोटीशीमध्ये संपादन मंडळाकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार गट क्रमांक, सिटी सर्व्हे क्र, संपादन क्षेत्र नमूद केले आहे. तथापी उपअधिक्षक, भूमि अभिलेख खेड यांचे कार्यालयाकडून त्याबाबत संयुक्त मोजणी करणेत येवून, मोजणीअंती अंतिमतः निश्चित होणाऱ्या क्षेत्राबाबत संपादनाची कार्यवाही करणेत येईल.
८. तसेच संपादनासंबंधी काही हरकती असलेस अथवा सदर जमिनीमध्ये अधिकार अभिलेखातील भूधारकांव्यतिरिक्त इतर कोणाचे काही कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी त्यासंबंधीचे कायदेशीर पुराव्यांसह सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून 15 दिवसांमध्ये उपविभागीय अधिकारी खेड, उपविभाग खेड (राजगुरुनगर) यांचे कार्यालय, वाडा रोड, पाण्याच्या टाकीजवळ, राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे येथे हरकती दाखल कराव्यात. अन्यथा सदर जमनी निर्वेध/निजोखमी आहेत असे समजून थेट खरेदी पध्दतीने संपादनाची पुढील कार्यवाही करणेत येईल याची नोंद घ्यावी.

**अनुसूची - एक**
**खरेदी घ्यावयाच्या जमिनीचा तपशील**
**भिमाशंकरवाडी, ता. खेड, जि. पुणे. गावाचे नाव - मौजे**

**अ) सिटी सर्व्हे क्रमांक :-**

| अ. क्र. | सिटी सर्व्हे क्र | सिटी सर्व्हेनुसार एकूण क्षेत्र (चौ. मी.) | खरेदी करावयाचे क्षेत्र (चौ. मी.) | हितसंबंधीत खातेदार/भूधारक |
|---|---|---|---|---|
| 1 | 1 | 2851.26 | 2851.26 | श्री. क्षेत्र भीमाशंकर संस्थान, भोरगिरी |
| 2 | 2 | 249.67 | 249.67 | श्री. अनाजी महादेव शेटे |
| 3 | 3 | 188.30 | 188.30 | श्री. गंगाराम लिंबा डामसे |
| 4 | 4 | 92.52 | 92.52 | श्री. राजेंद्र महादेव हिंगे श्री. बाळासाहेब महादेव हिंगे |
| 5 | 5 | 49.10 | 49.10 | श्री. दिपक भिकाजी देवाडे |
| 6 | 6 | 56.32 | 56.32 | श्री. गिरजु धोंडिबा चांभारे |
| 7 | 7 | 125.36 | 125.36 | श्री. अगस्ती शंकर वळवी |
| 8 | 8 | 131.75 | 131.75 | श्री. काशिनाथ सगन काणसकर |
| 9 | 9 | 297.73 | 297.73 | श्री. मधुकर रामकृष्ण गवांदे |
| 10 | 10 | 376.45 | 376.45 | श्री. मधुकर रामकृष्ण गवांदे |
| 11 | 11 | 508.16 | 508.16 | श्री. उदय बाळकृष्ण गवांदे<br>श्री. अरुण बाळकृष्ण गवांदे<br>श्री. पुरुषोत्तम बाळकृष्ण गवांदे<br>श्री. संजय बाळकृष्ण गवांदे |
| 12 | 12 | 217.17 | 217.17 | श्री. सुरेश लक्ष्मण कोडिलकर<br>श्री. शांताराम लक्ष्मण कोडिलकर |
| 13 | 13 | 328.20 | 328.20 | श्री. रत्नाकर रघुनाथ कोडिलकर |
| 14 | 14 | 44.02 | 44.02 | श्री. संतोष रघुनाथ कोडिलकर |
| 15 | 15 | 36.81 | 36.81 | श्री. बंडोपंत धोंडोपंत कोडिलकर |
| 16 | 16 | 589.51 | 589.51 | श्री. उदय बाळकृष्ण गवांदे<br>श्री. अरुण बाळकृष्ण गवांदे<br>श्री. पुरुषोत्तम बाळकृष्ण गवांदे<br>श्री. संजय बाळकृष्ण गवांदे |
| 17 | 17 | 389.10 | 389.10 | श्री. राहुल राजाराम कोडिलकर<br>श्री. नशिकेत अरुण कोडिलकर<br>श्रीमती सुजाता विठ्ठल कोडिलकर<br>श्री. अशोक गणेश कोडिलकर |
| 18 | 18 | 664.10 | 664.10 | श्री. राहुल राजाराम कोडिलकर |
| 19 | 19 | 85.12 | 85.12 | श्री. सुरेश लक्ष्मण कोडिलकर |
| 20 | 20 | 483.79 | 483.79 | श्री. गोरक्षनाथ मठ |
| 21 | 21 | 479.47 | 479.47 | श्री. क्षेत्र भीमाशंकर सेवा मंडळ पश्चिम विभागाचे मान्यवर अध्यक्ष खेड तालुका |
| 22 | 22 | 164.96 | 164.96 | नवबौध्द समाज मंदिर |
| 23 | 23 | 157.65 | 157.65 | श्री. मयुर प्रकाश शिर्के |
| 24 | 24 | 421.32 | 421.32 | श्री. क्षेत्र भीमाशंकर संस्थान, भोरगिरी |
| 25 | 25 | 265.50 | 265.50 | श्री. रविंद्र लक्ष्मण शिर्के |
| 26 | 26 | 86.79 | 86.79 | श्री. राजेंद्र महादेव मंडलिक |
| 27 | 27 | 67.28 | 67.28 | श्री. बबन आबाजी कौदरे |
| 28 | 28 | 132.39 | 132.39 | श्रीमती. सुगंधा प्रकाश शिर्के |
| 29 | 29 | 156.35 | 156.35 | श्री. सेक्रेटरी रोहिदास समाज सेवा मंडळ |
| 30 | 30 | 223.75 | 223.75 | सरपंच, ग्रामपंचायत भोरगिरी |
| 31 | 31 | 688.50 | 688.50 | भोरगिरी शाळा व अंगणवाडी |
| 32 | 32 | 49.27 | 49.27 | श्री. सचिन मारूजी कौदरे |
| 33 | 33 | 149.55 | 149.55 | श्री. जालिंदर शंकर कौदरे |
| 34 | 34 | 784.82 | 784.82 | श्री. वल्लभ चंद्रकांत कौदरे<br>श्री. अक्षय सुरेश कौदरे |
| 35 | 35 | 81.36 | 81.36 | श्री. चंद्रकांत बन्सीलाल कौदरे<br>श्रीमती. वनिता चंद्रकांत कौदरे |
| 36 | 36 | 65.39 | 65.39 | श्री. अनिल चिंधु कौदरे |
| 37 | 37 | 85.55 | 85.55 | श्री. संदिप नाना कौदरे |
| 38 | 38 | 66.74 | 66.74 | श्री. भानुदास दत्तात्रय कौदरे |
| 39 | 39 | 67.01 | 67.01 | श्री. शिवाजी रामभाऊ कौदरे |
| 40 | 40 | 69.20 | 69.20 | श्रीमती. किसनाबाई दगडु कौदरे श्री. मंगेश दगडु कौदरे |
| 41 | 41 | 53.54 | 53.54 | श्री. योगेश संभाजी शिर्के |
| 42 | 42 | 84.61 | 84.61 | श्री. गोरक्ष यशवंत कौदरे |
| 43 | 43 | 110.05 | 110.05 | श्री. सिताराम तानाजी कौदरे |
| 44 | 44 | 76.45 | 76.45 | श्री. सिताराम सखाराम शिर्के |
| 45 | 45 | 63.88 | 63.88 | श्री. नारायण ताराचंद शिर्के |
| 46 | 46 | 49.00 | 49.00 | श्री. नवनाथ यशवंत पांडे |
| 47 | 47 | 61.07 | 61.07 | श्री. अनिल नाथा कौदरे |
| 48 | 48 | 74.10 | 74.10 | श्री. रामभाऊ नारायण शिर्के |
| 49 | 49 | 173.07 | 173.07 | श्री. दत्तात्रय शंकर कौदरे |
| 50 | 50 | 221.20 | 221.20 | श्री. महंत दयानंद पुरी श्री. नागाबाबा (गोविंदपुरी नागाबाबा पंचदशनाम जुना आखाडा) |
| 51 | 51 | 542.61 | 542.61 | टिफिन बॉक्स, डबेवाल्यांची शाळा |
| 52 | 52 | 464.04 | 464.04 | श्री. श्रीराम मंदिर |
| 53 | 53 | 34.73 | 34.73 | श्रीमती. वनिता चंद्रकांत कौदरे |
| 54 | 54 | 623.18 | 623.18 | श्री. नारायणगिरी बाबा, श्री. पंचदसनाम जुना आखाडा,<br>श्री. क्षेत्र भीमाशंकर श्री. दत्त मंदिर |
| 55 | 55 | 630.48 | 630.48 | श्री. क्षेत्र भीमाशंकर संस्थान, भोरगिरी |
| 56 | 56 | 121.48 | 121.48 | श्री. गणपत रामचंद्र कौदरे |
| 57 | 57 | 63.88 | 63.88 | श्री. सिताराम दगडु हांडे<br>श्री. रामदास दगडु हांडे |
| 58 | 58 | 177.09 | 177.09 | श्री. अंकुश शांताराम कोकरे<br>श्री. दुंदा सामा काठे |
| 59 | 59 | 80.96 | 80.96 | श्री. धोंडु शांताराम कोकरे |
| 60 | 60 | 43.59 | 43.59 | श्री. रामा शांताराम कोकरे |
| 61 | 61 | 48.68 | 48.68 | श्री. गोविंद विष्णु सावंत<br>श्री. रघुनाथ रामभाऊ सावंत<br>श्री. धोंडू संतू सावंत |
| 62 | 62 | 27.36 | 27.36 | श्रीमती. मनाबाई लक्ष्मण काठे |
| 63 | 63 | 196.74 | 196.74 | श्री. सुदाम शंकर पवार<br>श्री. रामदास शंकर पवार<br>श्री. हनुमंत शंकर पवार<br>श्री. शामराव शंकर पवार |
| 64 | 64 | 50.83 | 50.83 | श्रीमती. वैशाली वल्लभ जोशी<br>श्रीमती गौरी हेमंत संत<br>श्रीमती शितल वल्लभ जोशी |
| 65 | 65 | 114.92 | 114.92 | श्री. किसन लिंबा डामसे<br>श्री. गंगाराम लिंबा डामसे |

पुढे पहा...

# ‘राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम’

## नागरिकांनी आपल्या ५ वर्षांखालील बालकांचे पोलिओ लसीकरण करून घेण्याचे वैद्यकीय विभागातर्फे आवाहन

**पिंपरी (दै. संध्या)**

■ ११२३ लसीकरण केंद्रांची स्थापना व सुमारे ५००० कर्मचाऱ्यांची नियुक्ती




जागतिक आरोग्य संघटनेने सन १९८८ मध्ये पोलिओ निर्मूलनाचे ध्येय निश्चित केले असून, त्याअनुषंगाने देशात सन १९९५ पासून राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम सातत्याने राबविण्यात येत आहे. या मोहिमेच्या माध्यमातून ५ वर्षांखालील सर्व बालकांना पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब देऊन त्यांचे संरक्षण करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. याच पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महानगरपालिका वैद्यकीय विभागामार्फत रविवार, दि. २८ जून २०२६ रोजी राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेचे आयोजन करण्यात आले असून, शहरातील सर्व पालकांनी आपल्या ० ते ५ वर्षे वयोगटातील बालकांना पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब अवश्य पाजावेत, असे आवाहन महापौर रवि लांडगे यांनी केले आहे.

या मोहिमेअंतर्गत दि. २८ जून २०२६ रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत शहरातील विविध पोलिओ बूथवर बालकांना पोलिओचे दोन थेंब देण्यात येणार आहेत. त्यानंतर दि. २९ जून ते ३ जुलै २०२६ या कालावधीत आरोग्य कर्मचारी घरभेटी देऊन राहिलेल्या बालकांचे लसीकरण करणार आहेत.

शहरातील ५ वर्षांखालील सर्व बालकांपर्यंत लसीकरण सेवा पोहोचविण्यासाठी महानगरपालिकेमार्फत एकूण ११२३ लसीकरण केंद्रांची स्थापना करण्यात आली आहे. यामध्ये महानगरपालिका दवाखाने, रुग्णालये, मोठी खासगी रुग्णालये आणि अंगणवाडी केंद्रांमध्ये १००८ स्थायी लसीकरण केंद्रे उभारण्यात आली आहेत. तसेच बस स्थानके, रेल्वे स्थानके आणि मेट्रो स्थानकांवर ३५ ट्रान्झिट लसीकरण केंद्रे, तर वीटभट्ट्या, बांधकामे आणि स्थलांतरित कुटुंबांच्या वस्त्यांमध्ये ७७ फिरती लसीकरण केंद्रे कार्यरत राहणार आहेत. याशिवाय, रात्रीच्या वेळेतही लसीकरण सेवा पोहोचविण्यासाठी तीन नाईट टीम कार्यरत असतील.

सदर मोहीम प्रभावीपणे राबविण्यासाठी ८ विभागीय प्रभारी वैद्यकीय अधिकारी, ९५ वैद्यकीय अधिकारी, ३१९ पर्यवेक्षक आणि ४५५२ लसीकरण कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. तसेच एएनएम, एमपीडब्ल्यू, आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका व मदतनीस, विविध महाविद्यालयांतील विद्यार्थी, महिला आरोग्य समिती सदस्य, रोटरी क्लबचे स्वयंसेवक आणि इतर स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी या मोहिमेत सहभागी झाले आहेत.

## महापालिका शाळांमध्ये स्वतंत्र डेटा ऑपरेटरची नियुक्ती करा

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांची माहिती, शैक्षणिक नोंदी, विविध शासकीय योजनांची माहिती, ऑनलाइन पोर्टलवरील माहिती भरणे, उपस्थिती नोंद, परीक्षा माहिती आणि इतर प्रशासकीय कामांचा वाढता भार लक्षात घेता प्रत्येक शाळेत स्वतंत्र डेटा ऑपरेटरची तात्काळ नियुक्ती करावी, अशी मागणी नगरसेविका ऐश्वर्या राजेंद्र तरस यांनी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्याकडे केली आहे.

यासंदर्भात ऐश्वर्या तरस यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सध्या अनेक शाळांमध्ये स्वतंत्र डेटा ऑपरेटर उपलब्ध नसल्याने ही सर्व कामे शिक्षकांना करावी लागत आहेत. त्यामुळे अध्यापनासाठी उपलब्ध होणारा वेळ कमी होत असून त्याचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होत आहे.

त्यामुळे महापालिकेतील सर्व शाळांमध्ये स्वतंत्र डेटा ऑपरेटर नेमणे, विद्यार्थी संख्या व प्रशासकीय कामांचा भार लक्षात घेऊन अतिरिक्त डेटा ऑपरेटर उपलब्ध करून देणे, शासकीय व महापालिका स्तरावरील ऑनलाइन कामे वेळेत पूर्ण होण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करणे तसेच शिक्षकांवरील अशैक्षणिक कामांचा ताण कमी करण्यासाठी उपाययोजना करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

## सुरक्षा रखवालदार यांना सुरक्षा निरीक्षक पदावर पदोन्नती देण्याबाबत ठराव

**पिंपरी (दै. संध्या)**



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील जे सुरक्षा रखवालदार पदोन्नतीसाठी पात्र असतील त्यांना सुरक्षा सुपरवायझरऐवजी सुरक्षा निरीक्षक पदावर पदोन्नती देण्याबाबतचा महत्त्वपूर्ण ठराव महापालिकेच्या विधी समितीच्या विशेष बैठकीत करण्यात आला आहे. हा ठराव अंतिम मंजुरीसाठी महापालिका सभेसमोर ठेवण्यात येणार आहे. विधी समितीची बैठक सभापती सुजाता बोराटे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

या बैठकीला विधी समिती सदस्य तथा नगरसदस्य ज्ञानेश्वर जगताप, विनायक गायकवाड, कुंदा भिसे, श्रुती डोळस, कुशाग्र कदम, शेखर चिंचवडे, वर्षा जगताप, तुषार सहाणे, नगरसचिव उल्हास जगताप यांच्यासह महापालिकेचे उपायुक्त राजेश आगळे, सिताराम बहुरे, संदीप खोत, सहायक आयुक्त अजिंक्य येळे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

बैठकीमध्ये सुरक्षा रखवालदार यांच्या पदोन्नतीबाबत महत्त्वपूर्ण ठराव करण्यात आला. यापूर्वी जे सुरक्षा रखवालदार पदोन्नतीसाठी पात्र असतील, त्यांना सुरक्षा सुपरवायझर या पदावर पदोन्नती देण्यात येत होती. तसेच पात्र सुरक्षा सुपरवायझर यांना सुरक्षा निरीक्षक पदावर पदोन्नती दिली जात होती. मात्र विधी समितीने आता सुरक्षा सुपरवायझर व सुरक्षा निरीक्षक या दोन्ही पदांचे समायोजन करून सुरक्षा निरीक्षक हे एकच पद ठेवून त्यावर पात्र सुरक्षा रखवालदार यांना पदोन्नती देण्याबाबत ठराव केला आहे. याशिवाय बैठकीत होर्डिंग्ज स्ट्रक्चरल ऑडिट, महापालिकेची महसूलवाढ, महापालिकेच्या ताब्यात असणाऱ्या उपलब्ध जागा आदींबाबत चर्चा करण्यात आली.

### जाहीर नोटीस

**मा. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी जुन्नर-आंबेगाव यांचे कोर्टात.**

क्र. फौज जन्म-मृत्यू/एसआ/769/25 — दिनांक:- 12.06.2026.

**नोटीस**

सुलताना मुबारक तांबोळी, - **अपिलार्थी**
रा. मोती चौक शिक्रापूर ता. शिरूर, जि. पुणे.

**विरुध्द**

निबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी
ग्राम अधिकारी/मुख्याधिकारी ग्रामपंचायत शिरोली त आळे - **प्रतिवादी**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमुद किरकोळ फौजदारी अर्जदार सुलताना मुबारक तांबोळी, रा. मोती चौक शिक्रापूर ता. शिरूर, जि. पुणे यांची स्वतः नामे **सुलताना मुबारक तांबोळी** यांचा **जन्म 07/08/1986 रोजी मौजे शिरोली त आळे, ता. जुन्नर जि. पुणे येथे झालेला आहे.** यांचा जन्म नोंदीचा हुकुम मिळविण्याकरीता अर्जदार यांनी या न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, कलम १३(३) प्रमाणे फौजदारी किरकोळ अर्ज नं. 769/25 दिनांक 10/12/2025 रोजी दाखल केलेला आहे. सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस वृतपत्रात प्रसिध्द झाल्यापासुन 15 दिवसांचे आत या न्यायालयात स्वत: अथवा आपले वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणणे कागदपत्रांसोबत मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर अर्जास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील हुकुम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि. 12/06/2026 रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यांनीशी ही जाहीर नोटीस दिली असे.

शिक्का

**सही/-**
**(अर्चना तांबे)**
**अति. उपविभागीय दंडाधिकारी**
**जुन्नर- आंबेगाव उपविभाग मंचर (पुणे)**

### जाहीर नोटीस

**मा. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी जुन्नर-आंबेगाव यांचे कोर्टात.**

क्र. फौज जन्म-मृत्यू/एसआ/768/25 — दिनांक:- 05.06.2026.

**नोटीस**

माहेजबीन करीम तिरंदाज, रा. मु. पो. जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे - **अपिलार्थी**

**विरुध्द**

निबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी
ग्राम अधिकारी/मुख्याधिकारी
जुन्नर नगरपरिषद - **प्रतिवादी**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमुद किरकोळ फौजदारी अर्जदार माहेजबीन करीम तिरंदाज, मु. पो. जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे यांची स्वतः नामे **माहेजबीन करीम तिरंदाज** यांचा **जन्म 03/06/1965 रोजी मौजे जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे येथे झालेला आहे.** यांचा जन्म नोंदीचा हुकुम मिळविण्याकरीता अर्जदार यांनी या न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, कलम १३(३) प्रमाणे फौजदारी किरकोळ अर्ज नं. 768/25 दिनांक 10/12/2025 रोजी दाखल केलेला आहे. सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस वृतपत्रात प्रसिध्द झाल्यापासुन 15 दिवसांचे आत या न्यायालयात स्वत: अथवा आपले वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणणे कागदपत्रांसोबत मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर अर्जास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील हुकुम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि. 05/06/2026 रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यांनीशी ही जाहीर नोटीस दिली असे.

शिक्का

**सही/-**
**(अर्चना तांबे)**
**अति. उपविभागीय दंडाधिकारी**
**जुन्नर- आंबेगाव उपविभाग मंचर (पुणे)**

### महावितरण — ई-निविदा

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

कार्यकारी अभियंता, महावितरण, पुणे नगर रोड विभाग, पुणे महावितरणमध्ये नोंदणीकृत नामांकित परवानाधारक विद्युत ठेकेदारांकडून निविदा क्र. ( EE/NRD/T-02/2026-27) साठी मुदतवाढ करण्यात येत आहे. निविदेची अंतिम तारीख महावितरणच्या http://www.mahadiscom.in/eTender/etender या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येतील.

**PRO No.PZ/066 / 2026-27** — कार्यकारी अभियंता (नगर रोड विभाग) पुणे

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 66 | 66 | 35.15 | 35.15 | श्री. कैलास किसन डामसे |
| 67 | 67 | 149.89 | 149.89 | श्री. गोविंद लक्ष्मण डामसे<br>श्री. चिंधु लक्ष्मण डामसे |
| 68 | 68 | 29.55 | 29.55 | श्रीमती. चिंधाबाई चिंधु कुऱ्हाडे |
| 69 | 69 | 35.37 | 35.37 | श्री. शैलेश किसन डामसे |
| 70 | 70 | 19.91 | 19.91 | श्रीमती. जिगरबाई नामदेव तिटकारे |
| 71 | 71 | 52.08 | 52.08 | ग्रामपंचायत भोरगिरी |
| 72 | 72 | 76.52 | 76.52 | श्री. खंडु सोमा सुपे |
| 73 | 73 | 78.10 | 78.10 | श्री. शांताराम नामदेव भोमाळे |
| 74 | 74 | 61.16 | 61.16 | ग्रामपंचायत भोरगिरी समाज मंदिर |
| 75 | 75 | 74.96 | 74.96 | श्री. किसन नामदेव भोमाळे |
| 76 | 76 | 141.87 | 141.87 | श्री. बाबु दुंदा दिवाळे |
| 77 | 77 | 97.90 | 97.90 | श्री. नारायण शंकर गेंगजे<br>श्रीमती. भागुबाई शंकर गेंगजे |
| 78 | 78 | 99.60 | 99.60 | श्री. नारायण शंकर गेंगजे<br>श्री. सिताराम शंकर गेंगजे<br>श्री. दिना चिंधा वाबळे |
| 79 | 79 | 294.59 | 294.59 | श्री. रामा धोंडू हिले श्री. दत्तु धोंडू हिले |
| 80 | 80 | 71.65 | 71.65 | श्री. विठ्ठल तुळशीराम तळपे<br>श्री. किरण मनोहर शेंगाळे |
| 81 | 81 | 83.65 | 83.65 | श्री. गणपत सखाराम गवारी<br>श्री. परशुराम सखाराम गवारी |
| 82 | 82 | 24.01 | 24.01 | श्री. मारूती कृष्णा काठे |
| 83 | 83 | 57.01 | 57.01 | श्री. शंकर गणपत काठे |
| 84 | 84 | 51.10 | 51.10 | श्री. नामदेव गणपत विरणक |
| 85 | 85 | 25.25 | 25.25 | श्री. गोविंद धोंडू हिले |
| 86 | 86 | 33.58 | 33.58 | श्री. मच्छिंद्र नानाभाऊ डफळ |
| 87 | 87 | 36.09 | 36.09 | श्री. विठ्ठल देवराम सुपे |
| 88 | 88 | 31.89 | 31.89 | श्री. दुंदा रामा सुपे |
| 89 | 89 | 33.97 | 33.97 | श्रीमती. लिलावती दत्तु हिले |
| 90 | 90 | 124.07 | 124.07 | श्री. शिवबाब चारिटेबल ट्रस्ट प्रेरित<br>श्री. वाल्मिक सेवा आश्रम सचिव श्री. महेंद्र मचिंद्र सातकर |
| 91 | 91 | 110.28 | 110.28 | श्री. नामदेव होनाजी कोळप |
| 92 | 92 | 10.56 | 10.56 | श्री. ज्ञानदेव होनाजी कोळप |
| 93 | 93 | 10.50 | 10.50 | श्री. अंजनी माता मंदिर |
| 94 | 94 | 296.18 | 296.18 | श्री. शंकर काळू शेंगाळे |
| 95 | 95 | 290.94 | 290.94 | श्री. सुदाम शंकर पवार<br>श्री. रामदास शंकर पवार<br>श्री. शामराव शंकर पवार<br>श्री. हनुमान शंकर पवार |
| 96 | 96 | 207.94 | 207.94 | श्री. लाल हनुमंत मंदिर महंत लालदास मठ सार्वजनिक |
| 97 | 97 | 18.06 | 18.06 | श्री. चिंधु लक्ष्मण डामसे |
| 98 | 98 | 241.92 | 241.92 | श्री. बुधा लक्ष्मण डामसे |
| 99 | 99 | 101.90 | 101.90 | श्री. बुधा लक्ष्मण डामसे |
| 100 | 100 | 77.15 | 77.15 | श्री. गोविंद लक्ष्मण डामसे |
| 101 | 101 | 186.79 | 186.79 | श्री. क्षेत्र भीमाशंकर नाभिक समाज सेवा मंडळ |
| 102 | 102 | 381.77 | 381.77 | श्री. रघुनाथ सदाशिव कोडिलकर<br>श्री. विश्वनाथ सदाशिव कोडिलकर<br>श्री. जगन्नाथ सदाशिव कोडिलकर |
| 103 | 103 | 7.63 | 7.63 | श्री. कैलास किसन डामसे |
| 104 | 104 | 6.19 | 6.19 | श्री. रविंद्र लक्ष्मण शिर्के |
| 105 | 105 | 5.28 | 5.28 | श्री. दत्तात्रय धोंडी हिले |

**ब) गट क्रमांक :-**

| अ. क्र. | गट क्रमांक | गटानुसार एकूण क्षेत्र (चौ. मी.) | खरेदी करावयाचे क्षेत्र (चौ. मी.) | हितसंबंधीत खातेदार/भूधारक |
|---|---|---|---|---|
| 1 | 1 | 145000.00 | 145000.00 | संतोष चंद्रकांत पटवा<br>श्री. राममंदिर ट्रस्ट<br>रजि. नं ए 1665<br>पुणे तर्फे अध्यक्ष<br>महंत दत्तगिरी महाराज |
| गट क्रमांकाचे एकूण क्षेत्र | | 145000.00 | 145000.00 | |
| एकुण क्षेत्र = अ + ब (चौ.मी) | | 19986.84+145000.00= **164986.84 (चौ.मी)** | 19986.84+145000.00= **164986.44 (चौ.मी)** | |

**दिनांक :-19/06/2026**
**ठिकाण : - राजगुरुनगर**

**सही/-**
**(अनिल दौंडे)**
**प्राधिकृत भूसंपादन अधिकारी तथा**
**उपविभागीय अधिकारी,**
**खेड उपविभाग, खेड (राजगुरूनगर)**

**जिमाका/पुणे/जाहिरात/१६/२०२६-२०२७**

## थोडक्यात पण महत्वाचे...



### कु. वर्षा ज्ञानेश्वर दाभाडे 'सीए' परीक्षेत उत्तीर्ण

कोरेगावमुळ (दैनिक संध्या) : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा श्रीप्रयागधामचे मुख्याध्यापक ज्ञानेश्वर राजाराम दाभाडे आणि अनिता दाभाडे यांच्या सुकन्या कु.वर्षा ज्ञानेश्वर दाभाडे यांनी इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया (ICAI) तर्फे घेण्यात आलेली 'सीए फायनल' (CA Final) परीक्षा यशस्वीपणे उत्तीर्ण केली आहे. आता त्या अधिकृतपणे 'चार्टर्ड अकाउंटंट' (सनदी लेखापाल) बनल्या आहेत. त्यांनी आपले शालेय शिक्षण महात्मा गांधी विद्यालय, उरुळी कांचन येथे घेतले. तर उच्च शिक्षण एस.पी. कॉलेज, पुणे (S P College Pune) येथून पूर्ण केले आहे. त्यांनी सीए CA अतुल भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली आपली आर्टिकलशिप पूर्ण केली होती. आपल्या या यशाबद्दल बोलताना वर्षा दाभाडे यांनी सांगितले की, 'सातत्यपूर्ण अभ्यास, योग्य नियोजन आणि आई-वडील तसेच शिक्षकांचे पाठबळ यांमुळेच मला हे यश संपादन करता आले'. त्यांच्या या उत्तुंग यशाबद्दल स्नेही, कुटुंबीय आप्तेष्ट नातेवाईक त्यांच्याकडून कौतुकाचा वर्षाव होत आहे. यावेळी निवेदक समाधान अवचट, पत्रकार बापुसो चौधरी, उपशिक्षक चंद्रकांत काकडे यांच्या सन्मान करण्यात आला तिला शुभेच्छा दिल्या.

### दावडी गावच्या विकासासाठी पहिल्या निधीतून पाऊलवाट



चाकण (दैनिक संध्या) : पुणे जिल्हा परिषदेचे सदस्य, गटनेते व खेड कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती ॲड. विजयसिंह शिंदे पाटील यांनी निवडणुकीच्या रणधुमाळीत दावडी ग्रामस्थांना दिलेला शब्द पूर्ण केला. पहिल्या निधीतून सनसनाटी पाऊलवाट तयार करण्यात आली आहे.पहिल्या निधीचा पहिला हप्ता माझ्या दावडी गावातील रस्त्यासाठी टाकणार, असे शिंदे पाटील यांनी सांगितले होते. तोच शब्द, तीच वचनबद्धता पूर्ण करण्यात आली आहे. दावडी गावातील स्थानिक पदाधिकाऱ्यांनी केलेल्या आग्रही मागणीची तात्काळ दखल घेऊन समाज कल्याण विभागाच्या माध्यमातून या महत्त्वाच्या रस्त्याच्या कामासाठी निधी मंजूर केला. विशेष म्हणजे रस्त्याच्या या कामाला प्रत्यक्ष गती दिली आहे. शिंदे पाटील यांनी सांगितले की," निवडणूक संपली तरी जनसेवेचे आणि विकासाचे व्रत अविरत सुरूच ठेवले आहे. समाजाला मी कृतीतून दाखवून दिले आहे. दिलेला शब्द केवळ बोलण्यापुरता नव्हता, तर तो प्रत्यक्ष कृतीत आणून गावाचा कायापालट करणे हेच आमचे ध्येय आहे. हा विकासनिधी दावडी गावच्या प्रगतीला आणि दळणवळणाला नवी गती देईल. विश्वास, प्रेम आणि विकासात्मक साथ हीच खरी कामाची ताकद असते.




### भिगवण मराठा महासंघाकडून समाजासाठी शहीद झालेल्या मावळ्यांसाठी मदत

भिगवण (दैनिक संध्या) : संघर्ष योद्धा मनोज जरागे पाटील यांच्या आंदोलनाला पाठिंबा देऊन आंतरवाली सराटी येथून इंदापूरला परतत असताना कार अपघातात मृत्युमुखी पडलेल्या इंदापूर तालुक्यातील सरडेवाडी येथील रामचंद्र जमदाडे,या मावळ्यासाठी जमा झालेली मदत रुपये ५५,०००/- (पचावन हजार) बुधवार दि.२४ रोजी घरी जाऊन त्यांच्या आई-वडिलांकडे सुपूर्त करण्यात आली यावेळी भिगवन मराठा महासंघाचे प्रमुख राजकुमार मस्कर अशोक साळुंखे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### शैक्षणिक पाठ्यपुस्तके महागल्याने पालक अडचणीत

■ महागाईने ग्रामीण भागातील पालकांचे आर्थिक बजेट कोलमडले

काऱ्हाटी (दैनिक संध्या) : जूनपासून नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात होत आहे. नवीन वर्ग, नवीन पुस्तके आणि नवीन मित्रांना भेटण्याची उत्सुकता विद्यार्थ्यांमध्ये असली, तरी दुसरीकडे पाठ्यपुस्तकाच्या किमतीत तब्बल १५ ते २० टक्क्यांपर्यंत शैक्षणिक साहित्याच्या वाढ झाली आहे. मात्र शाळा सुरू होण्यापूर्वीच पालकांच्या खिशाला कात्री बसणार असल्यामुळे पालकांची चिंता वाढली आहे.. नवीन शैक्षणिक वर्षाच्या स्वागतासाठी सध्या बाजारपेठेत विद्यार्थी आणि पालकांची शैक्षणिक साहित्य खरेदी करण्यासाठी लगबग दिसून येत आहे. यंदा शालेय साहित्य खरेदीवर महागाईचे सावट दिसून येत आहे.कागद, वाहतूक खर्च आणि मजुरी वाढल्याने बाजारात कच्या मालाच्या आणि कागदाच्या किमती वाढल्याने शैक्षणिक साहित्याच्या किमतीतही १५ ते २० टक्के वाढ झाली आहे. पाठ्यपुस्तके, वह्या, दप्तर, गणवेश, पेन, कम्पास बॉक्स, पाण्याच्या बाटल्या आणि इतर स्टेशनरीच्या दरात वाढ झाली आहे. खासगी व विनाअनुदानित शाळांतील विद्यार्थ्यांच्या पालकांना बाजारातून महागडे पुस्तक संच खरेदी करावे लागत असल्याने पालकांना आर्थिक ताण सहन करावा लागत आहे. एका विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक साहित्याचा खर्च आता ४ ते ५ हजारांच्या घरात पोहोचला आहे.गेल्या वर्षीच्या तुलनेत किमान एक ते दीड हजार रुपयांची अतिरिक्त झळ पालकांना सहन करावी लागत आहे. अगोदरच मोठ्या प्रमाणात वाढलेली महागाई, पेट्रोल-डिझेलचे वाढलेले दर आणि त्यातच आता मुलांच्या शिक्षणाचा वाढलेला खर्चामुळे सर्वसामान्य आणि मध्यमवर्गीय पालक त्रस्त झाले आहेत. खासगी शाळांच्या अवाढव्य फीसोबतच आता या साहित्यासाठी ४ ते ५ हजार रुपये अतिरिक्त मोजावे लागत आहेत. अनेक खासगी नोकरदारांचा 'पगार वाढत नाही, मात्र मुलांच्या शिक्षणाचा खर्च दरवर्षी दुप्पट होत आहे. त्यामुळे आता या सर्व गोष्टींचे बजेट कसे जुळवायचे?' असा प्रश्न पालकांना पडला आहे. पाऊस लांबल्याने अडचणीत वाढ झाली आहे.



### लक्ष्मी रघुनाथ चौधरी यांचे निधन

कोरेगावमुळ, (दैनिक संध्या) : सौ.लक्ष्मी रघुनाथ चौधरी यांचे वयाच्या ६९ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. ह.भ.प. रघुनाथ (बापु) चौधरी यांची पत्नी आहे. संदीप / दत्तात्रय रघुनाथ चौधरी यांची मातोश्री आहे.

# जुन्नरच्या विकासात वल्लभ बेनके यांचे मोठे योगदान



नारायणगाव (दै. संध्या)

जुन्नर तालुक्याच्या औद्योगिक, कृषी आणि सामाजिक विकासाला नवी दिशा देणारे दूरदृष्टीचे नेतृत्व म्हणून माजी आमदार स्वर्गीय वल्लभ बेनके यांचे नाव नेहमीच आदराने घेतले जाईल, असे प्रतिपादन विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष सत्यशील शेरकर यांनी केले. कांदळी औद्योगिक वसाहतीमध्ये स्व. वल्लभ बेनके यांच्या ७७ व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते स्व. वल्लभ बेनके यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यानंतर प्रा गणेश शिंदे यांचे प्रेरणादायी प्रवचन झाले.

सत्यशील शेरकर यांनी पुढे बोलताना सांगितले की, कांदळी येथे जुन्नर तालुका सहकारी औद्योगिक वसाहतीची स्थापना करून स्व. बेनके यांनी तालुक्याच्या औद्योगिक विकासाला एक नवी गती दिली. त्यांच्या या दूरदृष्टीमुळे स्थानिक परिसरातील हजारो तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या.

तालुक्याच्या सर्वांगीण प्रगतीमध्ये त्यांचे हे योगदान अत्यंत मोलाचे आणि विसरता न येणारे आहे.विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सन्मानया कार्यक्रमादरम्यान विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांचा गौरव करण्यात आला.

उद्योजक डॉ. श्याम भालचंद्र ढवण यांना 'उद्योगरत्न', उद्योजक चिमाजी पटाडे यांना 'उत्कृष्ट उद्योजक' पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच, सुप्रसिद्ध 'पद्मश्री' पुरस्कार विजेते रघुवीर खेडकर यांचाही यावेळी विशेष सत्कार करण्यात आला. यासोबतच, मंगेश भटकळ आणि राणी शिरतर यांना 'गुणवंत कामगार पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. औद्योगिक वसाहतीतील कामगारांना सुरक्षिततेसाठी आणि आरोग्यासाठी मॅट्रेसेसचे वाटपही करण्यात आले. तसेच पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत वसाहत परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

नेत्यांनी जागवल्या जुन्या आठवणी कार्यक्रमात बोलताना जुन्नर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती संजय काळे यांनी स्वर्गीय वल्लभ बेनके यांच्या कार्याचा गौरव केला. ते म्हणाले की, "वल्लभशेठ बेनके हे कष्टाळू, कणखर आणि तितकेच कमालीचे प्रेमळ व्यक्तिमत्त्व होते.

"प्रा. गणेश महाराज शिंदे यांनी आपल्या व्याख्यानात बदलत्या काळाची गरज ओळखून स्वतःमध्ये सकारात्मक बदल घडवण्याच्या आवश्यकतेवर भर दिला. स्व. बेनके यांनी दिलेला 'काळ आणि वेळेनुसार बदलले पाहिजे' हा मंत्र आजच्या काळातही किती महत्त्वाचा आहे, याची आठवण त्यांनी करून दिली.

याप्रसंगी बोलताना सत्यशील शेरकर यांनी माजी खासदार स्वर्गीय निवृत्तीशेठ शेरकर, सहकारमहर्षी स्वर्गीय शिवाजीराव काळे व माजी आमदार स्वर्गीय वल्लभ बेनके यांच्यातील जुन्या कौटुंबिक आणि राजकीय स्नेहाचे स्मरण केले. "स्वर्गीय वल्लभ बेनके यांनी मला नेहमीच चौथा मुलगा मानला आहे . त्यांनी अनेकदा मोलाचे मार्गदर्शन ही केले," असे भावूक उद्गार त्यांनी काढले. चालू राजकीय प्रवासाबद्दल बोलताना ते म्हणाले की, माजी आमदार अतुल बेनके, बाजार समितीचे सभापती संजय काळे आणि ते स्वतः मिळून जुन्नर तालुक्याच्या विकासासाठी कटिबद्ध आहेत आणि त्यांच्यातील हा एकोपा कायम राहील.

अतुल बेनके यांचे भविष्य अत्यंत उज्ज्वल असल्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. मान्यवरांची उपस्थितीया प्रसंगी माजी आमदार अतुल बेनके, शरद लेंडे,जिल्हा परिषद सदस्य कल्पना काळे, अनिल मेहेर, तानाजीशेठ बेनके, देवराम लांडे, छाया तांबे, मंगेश काकडे, अंकुश आमले, मोहित ढमाले ,कल्पना काळे, गणपत फुलवडे, विकास दरेकर, भीमाबाई दाभाडे , डॉ. सदानंद राऊत यांच्यासह विविध क्षेत्रातील अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे नेटके नियोजन अतुल कुलकर्णी व तुषार पडवळ यांनी केले, तर सूत्रसंचालन संतोष ढोबळे यांनी अतिशय उत्तम रीतीने पार पाडले. कार्यक्रमाच्या शेवटी कांदळी औद्योगिक वसाहतीचे अध्यक्ष अमित बेनके यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## वाढदिवसानिमित्त ज्ञानदानाचा संकल्प



चाकण (दै. संध्या)

वाढदिवसाचा आनंद समाजातील गरजू विद्यार्थ्यांसोबत साजरा करत भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष डॉ. दत्ताशेठ खांडेभराड व उपसरपंच रुपालीताई खांडेभराड यांनी कन्या कृष्णांगी हिच्या वाढदिवसानिमित्त शैक्षणिक साहित्य वाटपाचा स्तुत्य उपक्रम राबविला.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ठाकरवाडी, कडाचीवाडी येथे विद्यार्थ्यांना वह्या, पाटी, पेन्सिल, खोडरबर, पेन तसेच पाण्याच्या बाटल्या, लाडू व सामोसे देण्यात आले. गेल्या सात वर्षांपासून अखंडितपणे सुरू असलेल्या या सामाजिक उपक्रमातून यंदा तालुक्यातील सुमारे ५००० गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यांचे वितरण करण्यात येणार असल्याचे खांडेभराड यांनी सांगितले. शिक्षणासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाला बळ देण्याचा खांडेभराड कुटुंबाचा हा प्रयत्न समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे. या कार्यक्रमाला अश्विनी खांडेभराड, दीपाली कांबळे, अनिता कड, बायडाबाई ठाकर, सुजित हासे, बाळू पारधी आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुख्याध्यापक सुजित हासे यांनी सूत्रसंचालन केले. उपशिक्षक बाळू पारधी यांनी आभार मानले.

> "शिक्षणासोबत विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविणारा डॉ. खांडेभराड कुटुंबाचा हा उपक्रम गरुडझेप घेणारा व इतरांना प्रेरणा देणारा आहे. सर्वांनी त्यांचा आदर्श घेतला पाहिजे."
> **- बाळू पारधी, उपशिक्षक, ठाकरवाडी**

## आळंदीच्या पीएमपीएमएल बसस्थानकाची दाणादाण

आळंदी (दै. संध्या)

अनेक दिवसांच्या प्रतीक्षेनंतर आळंदी आणि परिसरात वरुणराजाने दमदार हजेरी लावत उकाड्यापासून दिलासा दिला. पावसामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असले, तरी या पहिल्याच पावसाने आळंदीतील नव्या पीएमपीएमएल बसस्थानकाच्या व्यवस्थेचे वास्तव समोर आणले आहे. बसस्थानक परिसरात सर्वत्र चिखल आणि साचलेल्या पाण्यामुळे प्रवाशांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे.

गेल्या तीन महिन्यांपासून आळंदी येथील देहू फाटा वाय जंक्शन परिसरातील एसटी महामंडळाच्या जागेत तात्पुरत्या स्वरूपात नवीन बसस्थानक सुरू करण्यात आले आहे. सध्या या ठिकाणावरून पुण्याकडे जाणाऱ्या पीएमपीएमएलच्या बससेवा सुरू आहेत. मात्र, या ठिकाणी प्रवाशांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध नसल्याचे चित्र स्पष्टपणे दिसून येत आहे.



**चिखलातून प्रवाशांची कसरत**

प्रवाशांना थांबण्यासाठी शेड नाही, बसण्याची व्यवस्था नाही, पावसापासून संरक्षणाची सुविधा नाही तसेच प्रकाश व्यवस्थाही अपुरी असल्याने नागरिकांची आधीपासूनच गैरसोय होत होती. त्यातच पहिल्याच पावसाने संपूर्ण परिसर चिखलमय झाल्याने परिस्थिती अधिक गंभीर बनली आहे. बसमध्ये चढताना आणि उतरताना प्रवाशांना साचलेल्या पाण्यातून मार्ग काढावा लागत असून ज्येष्ठ नागरिक, महिला आणि विद्यार्थ्यांना याचा अधिक फटका बसत आहे. काही ठिकाणी पाणी साचल्याने सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण झाला आहे.

पावसाळ्याला आता प्रत्यक्ष सुरुवात झाल्याने आगामी काळात ही समस्या अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे पीएमपीएमएल प्रशासनाने तातडीने या ठिकाणी निवारा शेड उभारावे, परिसरात खडी टाकून चिखलमुक्त व्यवस्था करावी तसेच प्रवाशांसाठी मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी प्रवासी आणि नागरिकांकडून होत आहे. "पावसामुळे दिलासा मिळाला; मात्र बसस्थानकातील गैरसोयींमुळे प्रवास अधिकच त्रासदायक ठरत आहे," अशी प्रतिक्रिया प्रवाशांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

## युवा शक्ती जागर यात्रेनिमित्त कृष्णराजदादा महाडिक यांचे जंगी स्वागत

राजगुरुनगर (दै. संध्या)

भारतीय जनता पक्ष युवा मोर्चाच्या युवा शक्ती जागर यात्रेनिमित्त भाजपा युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष मा. श्री. कृष्णराजदादा महाडिक यांचे राजगुरुनगर नगरीत उत्साहपूर्ण व जंगी स्वागत करण्यात आले. या दौऱ्यामुळे शहरातील राजकीय व सामाजिक वातावरणात विशेष उत्साहाचे चित्र पाहायला मिळाले.



या युवा शक्ती जागर यात्रेचे नियोजन राजगुरुनगर नगरपरिषदेचे नगराध्यक्ष तथा भाजपा राजगुरुनगर मंडल अध्यक्ष मा. श्री. शिवाजीदादा मांदळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. त्यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आलेला कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरित्या पार पडला.

यावेळी कृष्णराजदादा महाडिक यांनी क्रांतीवीर हुतात्मा राजगुरू यांच्या ऐतिहासिक वाड्यास भेट देऊन पाहणी केली तसेच त्यांच्या कार्यास अभिवादन केले. त्यानंतर राजगुरुनगर शहरातील विविध प्रलंबित विकासकामांबाबत भारतीय जनता पक्षाच्या नगरसेवकांसोबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीस भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मा. श्री. गणेश कवडे, राजगुरुनगर नगरपरिषदेचे भाजपा नगरसेवक मा. श्री. निलेश घुमटकर, मा. श्री. राजू जाधव, मा. श्री. फैज मोमीन आणि मा. श्री. कुमार सांडभोर यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

शहरातील विकासकामांना गती मिळावी, नागरिकांच्या मूलभूत सुविधांचे प्रश्न मार्गी लागावेत तसेच राजगुरुनगरच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक निधी उपलब्ध व्हावा, यासाठी भाजपा नगरसेवकांच्या वतीने कृष्णराजदादा महाडिक यांना निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनाची दखल घेत महाडिक यांनी राजगुरुनगर शहरातील प्रलंबित विकासकामांसाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून देण्यासाठी शासनस्तरावर पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. यामुळे उपस्थित नगरसेवक व कार्यकर्त्यांमध्ये समाधान व्यक्त करण्यात आले.

या प्रसंगी पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांमध्ये प्रचंड उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. राजगुरुनगर शहराच्या विकासासाठी भारतीय जनता पक्ष कटिबद्ध असून आगामी काळात शहरातील रखडलेली विकासकामे मार्गी लावण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतील, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

कृष्णराजदादा महाडिक यांच्या या दौऱ्यामुळे राजगुरुनगरच्या विकासाच्या अपेक्षांना नवी ऊर्जा मिळाली असून शहराच्या विकासाला नवी दिशा देणारा हा दौरा ठरणार असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

## वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठात्यांसह प्रमुखांच्या बदल्या

बारामती (दै. संध्या)

बारामती येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. चंद्रकांत म्हस्के यांची रत्नागिरीला बदली झाली आहे. याच महाविद्यालयातील शरीरशास्त्र विभागाच्या प्रा. डॉ. अंजली पाटील यांच्याकडे पुढील आदेश होईपर्यंत अधिष्ठातापदाचा कार्यभार सोपविण्यात आला आहे. दरम्यान याच महाविद्यालयाच्या शल्यचिकीत्साशास्त्र विभागाच्या प्रा. मंजुषा लिटके यांची बदली पुण्याच्या ट्रॉमा केअर सेंटर येथे करण्यात आली असून त्यांच्या जागी पुण्याच्या बी.जे. वैद्यकीय महाविद्यालयाचे ड़ॉ. किरणकुमार जाधव यांची बदली करण्यात आली आहे. महाविद्यालयाचे प्रशासकीय अधिकारी नंदकुमार कोकरे यांची अहिल्यानगरच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे प्रशासकीय अधिकारी म्हणून बदली झाली आहे. काही दिवसांपूर्वी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी अचानक भेट देऊन पाहणी केल्यानंतर अनेक त्रुटी आढळल्या. या नंतर उपमुख्यमंत्र्यांनी कमालीची नाराजी व्यक्त केली, त्याचे व्हिडीओ समाजमाध्यमांवर प्रसारीत झाल्यानंतर वैद्यकीय शिक्षण विभागाचे याची गंभीर दखल घेतली होती. त्या नंतर या महाविद्यालयात मोठे फेरबदल झाल्याचे स्पष्ट झाले आहे. रुग्णसेवा अधिक प्रभावी व परिणामकारक व्हायला हवी या वर सुनेत्रा पवार यांनी भर दिला होता. या संस्थेचे कामकाज अधिक परिणामकारक होण्यासाठी स्वताः उपमुख्यमंत्र्यांनीच लक्ष घातल्यामुळे येत्या काळात बदल दिसतील अशी अपेक्षा रुग्ण व नातेवाईकांनी व्यक्त केली आहे.

# २३ एकर जागा वाचण्यासाठी लोणारी समाजाचा जेजुरीत मोर्चा

जेजुरी (दै. संध्या)

महाराष्ट्राचे कुलदैवत असलेल्या जेजुरी नगरीत लोणारी समाजाची 23 एकर जागा आणि जेजुरी येथील धर्मशाळा वाचवण्यासाठी माजी आमदार रवींद्र धंगेकर यांच्या नेतृत्वाखाली गुरुवार दिनांक 25 जून रोजी भव्य मोर्चाचे आयोजन केले करण्यात आले आहे. अशी माहिती आंदोलनाचे संयोजक डॉ. रामदास कुटे आणि नवनाथ रानगट यांनी दिली आहे. ऐतिहासिक अशा जेजुरी नगरीमध्ये लोणारी समाज समाज बांधवांच्या अखिल लोणारी समाज धर्मशाळा आणि राधाबाई लोणारी ट्रस्ट अशा २ संस्था आहेत.अखिल लोणारी समाज धर्मशाळा या संस्थेची जेजुरीच्या मुख्य चौकामध्ये मोठी धर्मशाळा होती, मात्र येथील ट्रस्टी यांनी बेकायदेशीर पणे आणि अनागोंदी कारभार करून येथील धर्मशाळा पाडून या ठिकाणी व्यावसायिक गाळे उभे केले आहेत. त्या ठिकाणी समाज बांधवांची राहण्याची, कुलधर्म कुलाचार करण्यासाठी जागा उरलेली नाही. विद्यमान ट्रस्टी यांनी स्वतःच्या कुटुंबातील सदस्यांना येथे व्यावसायिक गाळे बांधून व्यवसायासाठी दिले आहेत. अनेक वेळा चर्चा व बैठका घेऊन देखील विद्यमान ट्रस्टी हे समाजाला न जुमानता बेकायदेशीर व एकाधिकार शाहीने समाजाला वेठीस धरीत आहेत .

तसेच राधाबाई लोणारी ट्रस्टची जेजुरी एमआयडीसी लगत मुख्य रस्त्याला 23 एकर जागा आहे. एकाच कुटुंबातील ट्रस्ट सदस्य असलेल्या ट्रस्टींनी या ठिकाणची जागा विक्रीसाठी धर्मदाय आयुक्त यांची परवानगी मिळावी यासाठी अर्ज केला आहे. महाराष्ट्रातील तमाम लोणारी बांधवांची ही फसवणूक असून एवढ्या महत्त्वाच्या ठिकाण ची जागा विकण्याची समाजाला कुठलीही गरज नाही. समाज लोकवर्गणीतून समाजाच्या विकासासाठी आणि शैक्षणिक प्रगतीसाठी वेगवेगळे शैक्षणिक व व्यावसायिक अभ्यासक्रम तसेच बहुउद्देशीय कार्यालय, कौशल्य विकास व प्रशिक्षण संस्था उभ्या करण्याचा समाजाचा मानस आहे, असे डॉ. रामदास कुटे यांनी प्रसिद्धीला दिलेल्या पत्रात म्हटले आहे. या मोर्चासाठी महाराष्ट्रभरातून समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असून विद्यमान दोन्ही ट्रस्ट वरील ट्रस्टींचे राजीनामे घेऊन ट्रस्ट बरखास्त करण्याची मागणी करणार आहे. तसेच धर्म शाळेतील बेकादशीर बांधकामाबाबत जेजुरी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांना निवेदन देऊन सदर बांधकाम हटवण्याची मागणी करणार आहे लवकरच दोन्ही ठिकाणी नवीन ट्रस्टी नेमून चांगल्या पद्धतीने समाज उपयोगी कामकाज करण्याच्या दृष्टीने पावले उचलले जातील. असेही डॉ. रामदास कुटे यांनी निवेदनात म्हटले आहे.

श्रीकांत राणे दिलीप राणे नाना ढेबंरे संदीप होळकर सुजीत राणे विक्रांत खाडे आदि समाजबांधव मोर्चाचे आयोजन केले आहे.




दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



# थोडक्यात पण महत्वाचे

## प्रत्येकी ५ लाखांची आर्थिक मदत वितरित

मुंबई (दैनिक संध्या) : सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यातील तांदुळवाडी येथे १४ जून २०२६ रोजी पिकअप वाहन विहिरीत कोसळून झालेल्या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या ८ जणांच्या वारसांना मुख्यमंत्री सहायता निधीतून प्रत्येकी ५ लाख रुपयांची आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलेल्या मदतीनुसार 'मुख्यमंत्री सहायता निधी कक्षा'मार्फत एकूण ४० लाख रुपयांची मदत सोलापूर जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून संबंधित वारसांना वितरित करण्यात आली. माळशिरस तालुक्यातील तांदुळवाडी येथे पंढरपूर-सातारा मार्गावर पिकअप वाहन विहिरीत कोसळून अपघात झाला होता. या अपघातात इंदुबाई दशरथ बावचे (वय ६५), पूजा अमोल सातुरे (वय २३), पूजाव बालाजी बावचे (वय २७), अश्विनी संदीप बावचे (वय २७), संस्कार संदीप बावचे (वय १४), संस्कृती संदीप बावचे (वय १४), भारव अमोल सातुरे (वय ८) आणि समर्थ बालाजी बावचे (वय ६ महिने) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या घोषणेनुसार जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर यांनी आर्थिक मदतीचा प्रस्ताव राज्य शासनाकडे सादर केला होता. प्रस्तावास मान्यता मिळाल्यानंतर मुख्यमंत्री सहायता निधीतून मृतांच्या वारसांना प्रत्येकी ५ लाख रुपये, अशी एकूण ४० लाख रुपयांची आर्थिक मदत सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत वितरित करण्यात आली.

## गुणगौरव पुरस्कारासाठी अर्ज करण्याचे आवाहन

मुंबई (दैनिक संध्या) : राज्य शासनाने २०२५-२६ च्या क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कारासाठी ऑनलाईन आवेदने मागविण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी २७ जून, २०२६ रोजी सकाळी १० वाजेपासून https://forms.gle/EgZ२६६AqNDxFJDZW८ या लिंकवर नावनोंदणी सुरू करण्यात येणार आहे. या अनुषंगाने राज्यातील शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा व मान्यताप्राप्त अनुदानित खाजगी प्राथमिक/ माध्यमिक/ उच्च माध्यमिक शाळांमधील इच्छुक शिक्षकांनी दिनांक १० जुलै, २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत ऑनलाईन आवेदन करावे, असे आवाहन शिक्षण संचालनालयामार्फत करण्यात आले आहे. शिक्षण हा समाजाच्या सर्वांगीण विकासाचा पाया आहे. समर्पित वृत्तीने काम करणाऱ्या शिक्षकांमुळेच समाज अणि राज्याचा तसेच राष्ट्राचा विकास होतो. अशा समर्पित वृत्तीने काम करणाऱ्या शिक्षकांना राज्य शासनाच्या वतीने दरवर्षी क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्काराने गौरविले जात असल्याची माहिती शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) डॉ. महेश पालकर यांनी दिली आहे.

## करुणाष्टके नाटकाने पटकाविले पारितोषिक

मुंबई (दैनिक संध्या) : 36 व्या महाराष्ट्र राज्य मराठी व्यावसायिक नाट्य स्पर्धेच्या अंतिम फेरीत भद्रकाली प्रॉडक्शन्स, मुंबई या संस्थेच्या करुणाष्टके या नाटकाला रु. 7 लाख 50 हजाराचे प्रथम पारितोषिक जाहीर झाल्याची घोषणा सांस्कृतिक कार्य संचालनालयाने प्रसिध्दीपत्रकाद्वारे केली आहे. सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत आयोजित या स्पर्धेच्या अंतिम फेरीचे निकाल पुढीलप्रमाणे जिगिषा अष्टविनायक, मुंबई या संस्थेच्या भूमिका या नाटकास रु. 4 लाख 50 हजाराचे द्वितीय पारितोषिक आणि जिगिषा क्रिएशन्स या संस्थेच्या चिरंजीव परफेक्ट बिघडलाय या नाटकास रु. 3 लाखाचे तृतीय पारितोषिक प्राप्त झाले आहे. 8 जून ते 18 जून, 2026 या कालावधीत छत्रपती शिवाजी नाट्यमंदिर, दादर (प), मुंबई या ठिकाणी अतिशय जल्लोषात झालेल्या या स्पर्धेत एकूण 10 व्यावसायिक नाट्यप्रयोग सादर करण्यात आले. स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून नयना आपटे, सुहास जोशी, प्रदीप कबरे, शेखर ढवळीकर व नंदकुमार पाटील यांनी काम पाहिले. सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांनी सर्व विजेत्यांचे अभिनंदन केले आहे. सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी प्रथम, द्वितीय व तृतीय आलेल्या नाटकांच्या नाट्यनिर्मात्यांचे तसेच इतर पारितोषिक प्राप्त कलाकारांचे अभिनंदन केले. व्यावसायिक नाट्य स्पर्धेच्या अंतिम फेरीत सहभागी झालेल्या सर्व संस्था आणि कलाकार यांनी मेहनत घेऊन सादर केलेल्या सर्व दर्जेदार नाटकांना प्रेक्षकांची भरघोस उपस्थिती होती.

# आपत्तीपश्चात पुनर्बांधणीसाठी वैज्ञानिक मूल्यांकनावर भर द्यावा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : राज्य आपत्ती व्यवस्थापन आढावा बैठकीत निर्देश

■ मुंबई (दै. संध्या)

भूस्खलन व इतर नैसर्गिक आपत्तींनंतर प्रभावित क्षेत्रांचे वैज्ञानिक पद्धतीने मूल्यांकन करणे आवश्यक आहे. पुनर्बांधणी, पुनर्प्राप्ती आणि दीर्घकालीन आपत्ती जोखीम कमी करण्यासाठी समन्वित व शाश्वत उपाययोजना राबविण्यात येत असून केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध यंत्रणांच्या सहकार्याने या प्रक्रियेला अधिक गती द्यावी ,असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. आपत्तीनंतरच्या प्रतिसाद गरजांचे मूल्यांकन आणि आपत्ती व्यवस्थापन उपाययोजनांचा आढावा घेण्यासाठी विधान भवन येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य आपत्ती व्यवस्थापन आढावा बैठक झाली.

बैठकीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांच्यासह मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, प्रधान सचिव वेद सिंगल, संचालक डॉ. भालचंद्र चव्हाण तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

ठाणे, रायगड, कोल्हापूर, पुणे, नाशिक तसेच विदर्भ आणि मराठवाड्यातील काही जिल्हे पूर आणि भूस्खलनाच्या दृष्टीने अतिधोका असलेले आहेत. या पार्श्वभूमीवर पूरनियंत्रणासाठी बहुआयामी दृष्टिकोन स्वीकारून पाणी निचरा यंत्रणेत सुधारणा, पूर्वसूचना प्रणाली बळकट करणे आणि प्रभावी स्थलांतर योजना राबविण्याचे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भूस्खलन, दरडी कोसळणे आणि संबंधित आपत्तींमुळे होणारी जीवित व वित्तहानी टाळण्यासाठी राज्यभर व्यापक सर्वेक्षण करण्याची आवश्यकता व्यक्त केली. संवेदनशील गावे व ठिकाणांची अद्ययावत आणि अचूक माहिती तयार करून तिचा प्रतिबंधात्मक उपाययोजनांसाठी वापर करण्यात यावा, असे त्यांनी सांगितले. तसेच जिल्हाधिकारी, तहसीलदार आणि जिल्हास्तरीय यंत्रणांनी संभाव्य धोक्यांच्या माहितीच्या आधारे तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, असे निर्देश त्यांनी दिले.

सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी कोल्हापूर जिल्ह्यातील पावसाळी आपत्ती व्यवस्थापनाबाबत महत्त्वपूर्ण सूचना मांडल्या. तसेच शहरी भागांतील महापुराच्या धोक्यांमुळे होणारी हानी कमी करण्यासाठी प्रभावी नियोजन आणि तातडीच्या उपाययोजनांची आवश्यकता अधोरेखित केली.

राज्यात आपत्तीपश्चात पुनर्बांधणी आणि पुनर्प्राप्ती प्रक्रियेला गती देण्यासाठी PDNA अंतर्गत विविध स्तरांवर महत्त्वपूर्ण प्रगती करण्यात आली आहे. केंद्र व राज्य शासनातील विभागांमध्ये समन्वय साधून कार्यवाही सुरू आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे पायाभूत सुविधा क्षेत्रात सुमारे ₹9,678 कोटींचे नुकसान झाल्याचा अंदाज असून कृषी, पशुसंवर्धन आणि मत्स्यव्यवसाय या उत्पादक क्षेत्रांनाही मोठा फटका बसला आहे. या संदर्भात राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे तांत्रिक सहकार्य घेण्यात येणार असून आवश्यक त्या विभागांसाठी नोडल अधिकारी नियुक्त करण्याची कार्यवाही करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

राज्यातील आठ जिल्हे भूस्खलनाच्या दृष्टीने अत्यंत संवेदनशील मानले जातात. राष्ट्रीय भूस्खलन जोखीम निवारण कार्यक्रमांतर्गत ₹100 कोटींचा निधी मंजूर करण्यात आला असून आठ संवेदनशील ठिकाणी कामे सुरू आहेत.

या अंतर्गत उतार स्थिरीकरण, पाण्याचा निचरा, धूप नियंत्रण, संरक्षक जाळ्या बसविणे, पूर्वसूचना प्रणाली विकसित करणे, संरक्षक अडथळे उभारणे आणि सूचना फलक बसविणे यांसारख्या उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

मुंबई आणि पुणे शहरांसाठी केंद्र पुरस्कृत प्रकल्पांतर्गत स्वतंत्र निधी उपलब्ध करून देण्यात येत असून पहिल्या टप्प्यात नागपूर, नाशिक आणि ठाणे शहरांचाही समावेश करण्यात आला आहे. ग्रामीण आपत्ती व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यांमध्ये विविध प्रकल्पांची अंमलबजावणी सुरू आहे.

महापूर व्यवस्थापन, नदीकाठ स्थिरीकरण, भूजल पुनर्भरण तसेच नैसर्गिक नाल्यांचे पुनरुज्जीवन यांसाठीही व्यापक उपाययोजना हाती घेण्यात आल्या आहेत.

राज्याच्या आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागाने तयार केलेल्या प्राथमिक आराखड्यानुसार विविध विभागांच्या गरजा विचारात घेऊन एकूण ₹29,707.42 कोटींच्या नियोजनाची आवश्यकता व्यक्त करण्यात आली आहे. यापैकी प्रत्यक्ष आपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित घटकांसाठी ₹9,613.95 कोटी, तर बाह्य व पूरक घटकांसाठी ₹20,093.47 कोटी इतक्या निधीची आवश्यकता भासू शकते, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

बैठकीत आगामी मान्सून हंगामासाठी राज्य शासनाची तयारी, जोखीम व्यवस्थापन, पूर्वसूचना प्रणाली आणि आपत्ती प्रतिसाद यंत्रणेचा आढावा घेणारे सादरीकरण प्रधान सचिव वेद सिंगल यांनी केले. बैठकीस जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणांचे (DDMA) अधिकारी तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले.

# कृषी पुरस्कार सोहळ्याचे राज्यपालांना निमंत्रण – कृषिमंत्री दत्तात्रय भरणे

■ मुंबई (दै. संध्या)

हरित क्रांतीचे प्रणेते आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व.वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त साजऱ्या होणाऱ्या कृषी दिनाचे औचित्य साधून बुधवार, १ जुलै २०२६ रोजी मुंबई येथे पुरस्कार सोहळा होणार आहे.



२०२३ व २०२४ या दोन्ही वर्षांतील राज्यस्तरीय कृषी पुरस्कार विजेत्यांचा सन्मान एकत्रितपणे करण्यात येणार असून, या सोहळ्यास राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांना कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी निमंत्रीत केले आहे. कृषिमंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, महाराष्ट्रातील कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, उत्पादनवाढ, शाश्वत शेती, नाविन्यपुर्ण कल्पना आणि कृषी विकासासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकरी, संस्था व कृषी क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव करण्यासाठी राज्यस्तरीय कृषी पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. राज्यातील प्रगतशील शेतकरी, कृषी संस्था आणि कृषी क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या सर्व घटकांच्या योगदानाचा सन्मान करणे ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे.

# 'हिमांशू रॉय लिगसी अवॉर्ड्स' वितरण कार्यक्रम

■ मुंबई (दै. संध्या)

■ राष्ट्रीय सुरक्षा, वैद्यकीय आणि संगीत क्षेत्रात दिल्या जाणाऱ्या समाजसेवेच्या कार्याचा 'हिमांशू रॉय लिगसी' पुरस्काराद्वारे उचित गौरव – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

पोलीस दलामध्ये कार्यरत असताना हिमांशू रॉय यांनी राष्ट्रीय सुरक्षा क्षेत्रात केलेले कार्य सर्वपरिचित आहे. हिमांशू रॉय फाउंडेशनच्या वतीने संशोधित केलेले कर्करोगाच्या सुरुवातीच्या काळातील निदानासाठी 'हिमांशू रॉय कॅन्सर डिटेक्शन किट' कर्करोगातील उपचाराकरिता निश्चितच महत्त्वाचे ठरत आहे. हे कार्य त्यांना खऱ्या अर्थाने श्रद्धांजली असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. राष्ट्रीय सुरक्षा, वैद्यकीय आणि संगीत क्षेत्रात दिल्या जाणाऱ्या 'हिमांशू रॉय लिगसी' पुरस्कारामुळे समाजाच्या सेवेसाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याचा गौरवच होत आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृहात आयोजित 'द हिमांशू रॉय लिगसी




पुरस्कार वितरण कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार, कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा, वित्त व नियोजन राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल हिमांशू राय फाउंडेशनच्या संस्थापक भावना रॉय उपस्थित होत्या. हिमांशू रॉय यांच्या कार्याचा गौरव करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, हिमांशू रॉय यांनी कर्करोगाशी लढा दिला. मात्र तो अयशस्वी ठरला. मुंबईतील गुन्हेगारी मोडीत काढण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. मुंबईतील लोकलमधील साखळी बॉम्बस्फोटाचा तपास आणि महाराष्ट्राच्या दहशतवाद विरोधी पथकाचे प्रमुख म्हणून त्यांनी केलेले कार्य राष्ट्र कधी विसरू शकणार नाही. प्रत्येक भूमिकेत त्यांनी आपल्या कार्याला न्याय देण्याचा प्रयत्न केला. कर्करोगातील लवकर निदानासाठी प्रतिष्ठानने संशोधित केलेले किट कर्करोगातील उपचारांमध्ये वरदान ठरत आहे. हिमांशू रॉय प्रतिष्ठानच्या वतीने महाराष्ट्रात 20 हजार लोकांना हिमांशू रॉय कर्करोग निदान कीटच्या माध्यमातून कर्करोगाच्या लवकर निदानासाठी लाभ मिळणार आहे.

# 'अमृत मानस मित्र' प्रशिक्षणातून मानसिक आरोग्य क्षेत्रात करिअरची सुवर्णसंधी

■ १५ दिवसांचे मोफत प्रशिक्षण मिळणार

■ मुंबई (दै. संध्या)

विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य, भावनिक सक्षमीकरण आणि समुपदेशन सेवा अधिक प्रभावी करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) यांच्या वतीने 'अमृत मानस मित्र' समुपदेशक प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करण्यात येत आहे. पहिल्या बॅचसाठी अर्जदारांना 29 जून 2026 पर्यंत ऑनलाईन अर्ज करता येईल. मानसिक आरोग्य क्षेत्रात करिअर घडवू इच्छिणाऱ्या युवकयुवतींसाठी हा उपक्रम महत्त्वाची संधी ठरणार आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था (एमआयएमएच), पुणे ही महाराष्ट्र शासनाची अग्रगण्य संस्था तांत्रिक व शैक्षणिक भागीदार म्हणून कार्यरत राहणार आहे. मानसिक आरोग्य, विद्यार्थी समुपदेशन, भावनिक आधार, संवाद कौशल्ये, सक्रिय ऐकणे, सहानुभूतीपूर्ण प्रतिसाद, संकट व्यवस्थापन, जीवनकौशल्ये आणि मानससामाजिक सहाय्य या विषयांवर आधारित हा अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करणाऱ्या उमेदवारांना अमृत व महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था यांचे संयुक्त अधिकृत प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल. पुणे येथे प्रथम १५ दिवसांचे ऑफलाइन प्रशिक्षण,इंटरॅक्टिव्ह सत्रे, केस स्टडीज, प्रात्यक्षिक उपक्रम आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन दिले जाईल. त्यानंतर एक महिना प्रॅक्टिकल फिल्ड एक्सपोजर (यात जिल्हा पातळीवर एका शाळा महाविद्यालयाला जोडून देण्यात येईल), त्यानंतर ३ ते ५ महिने प्रत्यक्ष व्यवसायासाठी महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्थेमार्फत नियमित मॉनिटरिंग, मेंटरिंग, ऑनलाइन सत्र आणि प्रत्यक्ष अडचणीचे निवारण आणि मार्गदर्शन आणि प्रत्यक्ष व्यावसायिक सहाय्य असे सर्वसाधारण स्वरूप आहे. संपूर्ण प्रशिक्षण महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था (एमआयएमएच), पुणे या महाराष्ट्र शासनाच्या संस्थेच्या तज्ज्ञ मार्गदर्शकांद्वारे दिले जाईल. त्याचप्रमाणे अमृतमार्फत विविध तज्ञ मार्गदर्शकाचे वेळोवेळी अनुभवाधारित प्रत्यक्ष मार्गदर्शन आणि सहकार्य मिळणार आहे. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था (एमआयएमएच) च्या तज्ज्ञांकडून नियमित ऑनलाइन मार्गदर्शन दिले जाईल. यामध्ये – केस डिस्कशन नियमित ऑनलाइन सुपरव्हिजन, मेंटरिंग सत्र, प्रत्यक्ष कामातील अडचणींचे निराकरण व्यावसायिक मार्गदर्शन कौशल्य वृद्धीसाठी सातत्यपूर्ण सहाय्याचा समावेश असेल. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एनईपी 2020) नुसार कौशल्याधारित शिक्षण, समाजाभिमुख प्रशिक्षण आणि रोजगारक्षमतेवर भर देण्यात आला आहे.

# एकल महिलांच्या सन्मान, सुरक्षा आणि सक्षमीकरणासाठी व्यापक धोरण राबविणार

■ मुंबई (दै. संध्या)

राज्यातील अंदाजे ५० ते ५५ लाख एकल महिलांच्या सन्मान, सुरक्षा आणि सक्षमीकरणासाठी स्वतंत्र व व्यापक धोरण राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला असून, त्यांच्या हितसंवर्धनाला सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल, असे प्रतिपादन महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी केले. महिला व बाल विकास विभाग, मुंबई शहर यांच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयात 'एकल महिला दिन' तसेच प्रस्तावित 'एकल महिला धोरण' यानिमित्त आयोजित जिल्हास्तरीय कार्यशाळेत त्या अध्यक्षस्थानावरून बोलत होत्या. यावेळी मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते तसेच जिल्हाधिकारी



आंचल गोयल यांच्या उपस्थितीत महिला व बाल विकास विभागाच्या विविध योजनांची माहिती देणाऱ्या क्यूआर कोडचे अनावरण करण्यात आले. कार्यक्रमात जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी शोभा शेलार यांनी एकल महिला धोरणाचे महत्त्व, कार्यशाळेची उद्दिष्टे आणि धोरण निर्मितीची प्रक्रिया याविषयी सविस्तर माहिती दिली. कार्यशाळेत विविध स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, विभागाच्या लाभार्थी महिला तसेच अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सर्वाधिक मूल्य असलेल्या पिकांच्या नुकसानीच्या आकडेवारीसाठी ड्रोनचा वापर करा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : केळी पिकाच्या विम्यासंदर्भात विधानभवनात बैठक; शेतकऱ्यांना तात्काळ भरपाई देण्याचे आदेश

■ मुंबई (दै. संध्या)

राज्यातील सर्वाधिक मूल्य असलेल्या पिकांच्या नैसर्गिक आपत्तीत होणाऱ्या नुकसानीची अचूक आकडेवारी मिळविण्यासाठी आगामी कालावधीत कृषी आणि आपत्ती व्यवस्थापन यांनी संयुक्तरित्या ड्रोनचे सर्वेक्षण करण्यासाठी कार्यवाही करावी. यामुळे शेतकऱ्यांना झालेल्या नुकसानीची अचूक माहिती मिळेल व पीक विमा कंपन्यांना भरपाई देताना कोणतीही अडचण येणार नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. राज्यातील केळी पिकांच्या नुकसानीबाबत विमा कंपन्यांनी स्थानिक प्रशासनाने केलेली नोंद तपासून घ्यावी. रियल टाइम डाटा, महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग ॲप्लिकेशन सेंटरचा डाटा आणि सॅटेलाइट डाटा तपासून घेऊन तात्काळ भरपाईची कार्यवाही करण्याचे निर्देशही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. जळगाव जिल्ह्यातील केळीबाग नुकसानीसंदर्भात विधान भवनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. त्यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,



आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, रोहयो मंत्री भरत गोगावले, आमदार अमोल जावळे, आमदार चंद्रकांत पाटील, आमदार मंगेश चव्हाण, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, प्रधान सचिव डॉ.श्रीकर परदेशी, कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह, कृषी आयुक्त सूरज मांढरे, जळगावचे जिल्हाधिकारी रोहन घुगे, यासह इतर विभागाचे अधिकारी तसेच विमा कंपन्याचे प्रतिनिधी उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्य शासनाने शेतकऱ्यांच्या संरक्षणासाठी पीकविमा योजनांमध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक सहभाग नोंदविला आहे. त्यामुळे पात्र शेतकऱ्यांना कोणताही त्रास होणार नाही याची दक्षता विमा कंपन्यानी घेतली पाहिजे. त्याचवेळी गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून पडताळणी प्रक्रिया अधिक मजबूत करण्यात यावी. जळगाव जिल्ह्यात 2025-26 या हंगामात केळी पीकासाठी सुमारे 99 हजारांहून अधिक विमा अर्ज प्राप्त झाले होते. महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग ॲप्लिकेशन सेंटर मार्फत उपग्रह छायाचित्रांच्या आधारे मोठ्या प्रमाणावर क्षेत्र तपासणी करण्यात आली. यामुळे प्रत्यक्ष लागवड झालेल्या क्षेत्राची अचूक पडताळणी शक्य झाली असून पात्र शेतकऱ्यांचे हित अधिक प्रभावीपणे संरक्षित होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, गेल्या अनेक वर्षांत राज्य शासनाने फळपिक विमा योजनांद्वारे शेतकऱ्यांना मोठा आधार दिला आहे. केळी पिकासाठी विमा संरक्षणाची रक्कम प्रतिहेक्टर 1.70 लाख रुपये असून नैसर्गिक आपत्ती, गारपीट, कमी तापमान, वेगवान वारे आणि अतितापमान यांसारख्या जोखमींपासून शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण मिळत आहे." राज्य सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे. पात्र केळी उत्पादकांना न्याय मिळेल याची पूर्ण काळजी घेतली जाईल.

पीकविमा योजनेतील पारदर्शकता वाढविण्यासाठी तंत्रज्ञानाचा व्यापक वापर करण्यात येत असून, शेतकऱ्यांच्या हिताचे संरक्षण आणि कृषी क्षेत्र अधिक सक्षम करणे हेच राज्य सरकारचे सर्वोच्च प्राधान्य असणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, विमा कंपन्यांनी शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास न होता झालेल्या नुकसानीनुसार मदत करावी. विमा कंपन्यांनी आपली मानसिकता बदलावी. शेतकऱ्यांच्या हितासाठी शासन विमा कंपन्याना पैसे देत असते त्याची जाणीव ठेवून शेतकरी अडचणीत असताना कोणत्याही प्रकारची अडवणूक न करता नियमांप्रमाणे शेतकऱ्यांना मदत वितरीत करावी.

पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील म्हणाले की, जळगाव येथील केळी उत्पादक शेतकऱ्यांना नुकसानभरपाईची मदत मिळण्यासाठी नुकसानीचे पंचनामे तपासून सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने कार्यवाही करावी. महसूल विभागाची मदत घेऊन बाधित शेतकऱ्यांना तात्काळ दिलासा देण्यासाठी आवश्यक ती पावले उचलावीत. शेतकऱ्यांना त्वरित मदत पोहचवावी.

बैठकीत जळगाव जिल्ह्यातील केळी पीकविमा संदर्भातील स्थिती, महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग ॲप्लिकेशन सेंटर मार्फत करण्यात आलेली उपग्रहाधारित तपासणी, पात्र व अपात्र विमा प्रस्तावांची माहिती तसेच शेतकऱ्यांच्या हितासाठी राबविण्यात येणाऱ्या उपाययोजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### मतदार यादी पुनरीक्षण मोहिमेदरम्यान 114 अधिकाऱ्यांच्या बदल्यांना स्थगिती

पुणे (दैनिक संध्या) : केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्देशांनुसार राज्यात ३० जूनपासून मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरीक्षण मोहीम सुरू असूनही या मोहिमेत कर्तव्यावर असलेल्या ११४ भूमी अभिलेख अधिकाऱ्यांच्या बदल्यांच्या आदेशांना स्थगिती देण्याची नामुष्की मंत्रालय स्तरावर ओढविली आहे. याबाबत आयोगाने कोणत्याही अधिकाऱ्याची बदली करता येणार नाही, अशी सक्त ताकीद दिल्यानंतर या सर्व उपअधीक्षकांच्या बदल्या रद्द केल्या आहेत. दरम्यान, या दोन बदल्यांसोबत दोन उपसंचालक दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या आहेत. मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाचा दुसरा टप्पा ३० जूनपासून सुरू होत आहे. त्यासाठी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण सुरू आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्देशांनुसार या मोहिमेसाठी नियुक्त अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या बदल्या करू नयेत, अशा स्पष्ट सूचना राज्याच्या मुख्य सचिवांना दिल्या आहेत. राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनीही याबाबत सर्व विभागांच्या सचिवांनाही याची कल्पना दिली होती. आयोगाच्या या निर्देशांनुसार राज्य सरकारने बदल्यांसाठी १५ ते ३० जून असा कालावधी निश्चित केला होता. मात्र, या बदल्या पुनरीक्षण मोहिमेत असलेल्या अधिकाऱ्यांच्या करू नयेत, असे निर्देश दिले होते. मात्र, महसूल विभागातील मंत्रालय स्तरावरील अधिकाऱ्यांनी भूमी अभिलेख विभागातील ११४ भूमी अभिलेख उपअधीक्षकांच्या राज्यांतर्गत बदल्यांचे आदेश सोमवारी (दि. २२) रात्री काढले.

### प्रस्तावित अपर जिल्हाधिकारी कार्यालय बारामतीच्या अनुषंगाने हरकतींचे आवाहन

पुणे (दैनिक संध्या) : महसूल व वन विभागाच्या आदेशानुसार प्रस्तावित अपर जिल्हाधिकारी कार्यालय बारामतीबाबत नागरिकांनी आपल्या हरकती व सूचना जिल्हाधिकारी कार्यालयाकडे 8 जुलै 2026 पर्यंत सादर करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी केले आहे. प्रस्तावित अपर जिल्हाधिकारी कार्यालय बारामतीच्या कार्यक्षेत्रातील बारामती, इंदापूर, आणि दौंड तालुक्याचा समावेश करण्यात आला आहे. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात पुणे शहर, आंबेगाव, खेड, मावळ, मुळशी, हवेली, शिरुर, पुरंदर, जुन्नर, भोर आणि राजगड या तालुक्याचा समावेश करण्यात आला आहे. जिल्ह्यातील तालुक्यातील तालुक्यांची संख्या 14 असून याकरिता जिल्हा पुणे असणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी श्री. डुडी यांनी दिली आहे.

### श्रीपालवण शाळेत शैक्षणिक साहित्य वाटप

दहिवडी (दैनिक संध्या) : श्रीपालवण (ता. माण) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना दरवर्षीप्रमाणे याही वर्षी मोफत शैक्षणिक साहित्य वाटपाचा कार्यक्रम उत्साहात झाला. युवा विचारमंच सामाजिक संस्था श्रीपालवण यांच्या वतीने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामीण भागातील आणि शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने संस्था गेली तीन वर्षे सलग हा उपक्रम राबवत आहे. या वर्षीच्या उपक्रमासाठी आंबेगाव तालुक्यातील अनिकेत मेंगडे, जुन्नर तालुक्यातील मयूर नलावडे आणि माण तालुक्यातील शिरवलीचे यश राजेंद्र जगदाळे यांनी मोलाचे अर्थसाहाय्य केले.

### कोरेगाव सातारा रेल्वे स्थानकाचे नूतनीकरण सुरु; प्रवासी संघाच्या पाठपुराव्याला यश

कोरेगाव (दैनिक संध्या) : सातारा रेल्वे स्थानकाच्या नूतन इमारतीच्या छताची गळती व प्लॅस्टर उडून जाऊ लागल्याने सातारा रेल्वे प्रवासी संघ, सातारा रेल्वे स्थानक स्थानिक सल्लागार समितीने वारंवार आवाज उठवल्यामुळे रेल्वे प्रशासनाने नुकतेच या इमारतीची दुरुस्तीचे काम हाती घेतले आहे. सातारा रेल्वे स्थानकासाठी जुन्या इमारतीला लागून चार वर्षांपूर्वी ऐतिहासिक लुक असलेली नवीन इमारत बांधली होती. या नूतन इमारतीचे उद्घाटन २८ फेब्रुवारी २०२३ रोजी झाले होते. त्याच वर्षी इमारतीचा छत गळू लागला होता, तर ठिकठिकाणी इमारतीचे प्लॅस्टर उडून जाऊ लागले होते. अनेक ठिकाणी फरशाही निघू लागल्या होत्या. परिणामी, ऐतिहासिक व सुंदर लुक असलेली ही इमारत नवीन असूनही निकृष्ट दर्जाच्या कामामुळे तब्बल १०० वर्षे जुनी जीर्ण असल्यासारखी दिसू लागली होती. या पार्श्वभूमीवर या इमारतीच्या निकृष्ट बांधकामाची तपासणी गुणवत्ता प्राधिकरण, दक्षता प्राधिकरणाकडून करण्याची मागणी सातारा रेल्वे स्थानक सल्लागार समितीचे माजी सदस्य व सातारा रेल्वे प्रवासी संघाचे अध्यक्ष विलास कदम यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव, रेल्वे बोर्डाचे चेअरमन, मुख्य महाव्यवस्थापक महाराष्ट्र राज्य, पुणे विभागीय रेल्वे व्यवस्थापक यांच्याकडे वारंवार निवेदने देऊन केली होती. वारंवार छायाचित्रांसह वार्तांकन करून आवाज उठवलेला होता. त्याची गंभीर दखल घेत नवीन इमारतीचे निकृष्ट दर्जाचे प्लॅस्टर काढून नवीन प्लॅस्टर करण्याचे काम सुरू करण्यात आले आहे.

# सासवडमध्ये एकल महिला दिनानिमित्त स्वावलंबनाचा कानमंत्र

सासवड (दै. संध्या)

सासवड नगरपरिषदेच्या महिला व बालकल्याण समितीच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनात एकल महिला दिनानिमित्त मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. महिला व बालकल्याण मंत्रालय, भारत सरकारच्या निर्देशानुसार विधवा, घटस्फोटीत किंवा परितक्ता अशा शब्दांऐवजी 'एकल महिला' असा सन्मानजनक शब्दप्रयोग करत त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचा संकल्प या कार्यक्रमातून करण्यात आला.


■ सासवड (ता.पुरंदर) : 'एकल महिला दिन' कार्यक्रमाप्रसंगी उपस्थित पदाधिकारी ■

या कार्यक्रमात संजय गांधी निराधार योजना, आयुष्मान भारत, बचत गट आणि स्वयंरोजगार यांसारख्या विविध शासकीय योजनांची माहिती तहसील कार्यालयातील संजय गांधी निराधार योजनेचे अक्षय शिर्के, पंचायत समितीचे अच्यूत शेवाळे, आयुष्मान भारताच्या महिला बालकल्याण संरक्षण अधिकारी शूभदा जगताप या तज्ज्ञांनी दिली. एकल महिलांना या योजनांचा लाभ सुलभरीत्या मिळावा, यासाठी पात्रता, आवश्यक कागदपत्रे आणि संपर्क प्रक्रिया यांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच, डॉ. नारायण टाक यांनी महात्मा जोतिराव फुले यांच्या कार्यावर प्रकाश टाकत महिलांना प्रेरणा दिली. नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप यांनी, सासवड नगरपरिषदेमार्फत एकल महिलांसाठी विविध प्रशिक्षण आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत. महिलांनी पुढाकार घेऊन नाव नोंदणी करावी, जेणेकरून त्यांना स्वावलंबी बनवता येईल, असे आवाहन केले. तसेच, एकल महिलांना समाजात सन्मानाची आणि समानतेची वागणूक मिळावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. याप्रसंगी महिला व बालकल्याण समितीच्या सभापती प्रियांका जगताप, उपसभापती लीना वढणे, नगरसेविका अर्चना जगताप, शितल भोंडे तसेच माजी नगराध्यक्षा मीना वढणे, माया जगताप, सारिका हिवरकर यांसह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. सासवड शहरातील १७५ महिलांनी या उपक्रमात सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साहाय्यक प्रकल्प अधिकारी जस्मिन मधाळे यांनी केले.

## सिंहगड एपिक ट्रेल मॅरेथॉन येत्या शनिवारी

पुणे (दै. संध्या)

■ वेस्टर्न घाट्स रनिंग फाउंडेशनच्या वतीने स्पर्धेचे आयोजन

वेस्टर्न घाट्स रनिंग फाउंडेशनच्या वतीने सिंहगड एपिक ट्रेल या आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धा येत्या शनिवारी (दिनांक २७ जून २०२६) रोजी पार पडणार आहे. यावर्षी जगभरातून ४ देश, भारतातील ३५ राज्य व ६५ शहरातून ११ कि.मी., २१ कि. मी., ३० कि.मी., व ४२ कि.मी. अंतर धावण्यासाठी १२०० धावपट्टूंनी सहभाग घेतला आहे. स्वराज्याचा दैदीप्यमान ऐतिहासिक वारसा असलेल्या सिंहगडावर ही स्पर्धा सिंहगडाच्या वेगवेगळ्या पाच वाटांवरून पूर्ण करायची असते. सलग ११ तास चालणाऱ्या या माउंटन ट्रेल मॅरेथॉनमध्ये डोंगर-दऱ्या, चिखल, कडे-कपाऱ्या, आणि सिंहगडाच्या विविध वाटांवरून चित्तथरारक अनूभव स्पर्धकांना मिळतो. पर्यावरण संरक्षण, पुरातन वास्तू आणि गडकोट संवर्धनाच्या संदेशाबरोबरच व्यायामाचा संदेश या स्पर्धेच्या माध्यमातून दिला जातो. स्पर्धेची सुरवात आणि शेवट सिंहगडाच्या पायथ्याला आतकरवाडी गावापासून करण्यात आली. या स्पर्धेचे आयोजन वेस्टर्न घाट रनिंग फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष दिग्विजय जेधे, फाऊंडेशनचे सदस्य अनिल पवार, महेश मालुसरे, मंदार मते, ॲड. राजेश सातपुते, मारूती गोळे, अमर धुमाळ यांच्या सोबतच वेस्टर्न घाट रनिंग फाउंडेशने ४०० स्वयंसेवकांनी केले आहे. वेस्टर्न घाट्स रनिंग फाउंडेशन दरवर्षी सिंहगड एपिक ट्रेल या आंतरराष्ट्रीय मॅरेथॉनचे आयोजन जूनच्या अखेरच्या शनिवारी करत असते. सिंहगड एपिक ट्रेल ही स्पर्धा इंटरनॅशनल ट्रेल रनिंग असोसिएशन बरोबर निगडित आहे. ही चित्तथरारक स्पर्धा छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेल्या स्वराज्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणार्या सर्व शूरवीर मावळ्यांना समर्पित करण्यात येते अशी माहिती संस्थचेचे अध्यक्ष दिग्विजय जेधे यांनी दिली.

## दौंड नगरपरिषदेत महिला अधिकाऱ्याचा विनयभंग; शासकीय कामात अडथळा

दौंड (दै. संध्या)

दौंड नगरपरिषद कार्यालयात एका महिला अधिकाऱ्याला अश्लील शिवीगाळ करून तिचा विनयभंग करण्याचा प्रयत्न तसेच शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी गब्बर वाल्मीकी (पूर्ण नाव व पत्ता अपूर्ण) याच्याविरुद्ध दौंड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत दौंड नगरपालिकेतील ३४ वर्षीय महिला अधिकाऱ्यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सोमवारी (दि. २२) दुपारी सुमारे २ वाजण्याच्या सुमारास दौंड नगरपरिषद कार्यालयात हा प्रकार घडला. आरोपी गब्बर वाल्मीकी हा फिर्यादीच्या सहकाऱ्यांच्या कॅबिनबाहेर उभा राहून अश्लील हावभाव करत शिवीगाळ करू लागला. त्याच्या वर्तनामुळे फिर्यादीच्या मनात लज्जा निर्माण झाली, तसेच वाल्मिकीने धमकीवजा भाषा वापरत, 'ती येथे कशी काम करते ते पाहून घेतो' असे म्हणत फिर्यादीकडे पाहून कार्यालयातील शासकीय कामकाजात अडथळा निर्माण केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी दौंड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सध्या दौंड नगरपालिकेत आंधळ दळतयआणि कुत्रा पीठ खाते अशी परिस्थिती झाली आहे ठेकेदार मुजोर झाले आहेत दोन्ही गट देखील आपापल्या परीने मर्जीतील ठेकेदारांना कामे देण्यात व्यस्त आहेत. त्यामुळे दौंड नगरपालिकेची परिस्थिती आपण दोघे भाऊ भाऊ नगरपालिका वाटण खाऊ या म्हणीप्रमाणे झाली आहे जिल्हाधिकारी मात्र याबाबतीत काहीही बोलायला तयार नाहीत नगरपालिकेबद्दल अनेक तक्रारी आहेत.

## विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक संपन्न

पुणे (दै. संध्या)

■ मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधींची नेमणूक करण्याचे राजकीय पक्षांना आवाहन



भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमास जिल्ह्यात राबविण्यास सुरुवात झाली आहे. याकरिता सुमारे ८ हजार ४१७ बीएलओ आणि विविध राजकीय पक्षांचे ४ हजार ५५७ मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी (बीएलए)या प्रक्रियेत सहभागी होणार आहेत. तथापि अद्यापही विधानसभा मतदारसंघामध्ये काही राजकीय पक्षांनी मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधींची नेमणूक केलेली नाही, तरी एसआयआर प्रकियेची संपूर्ण माहिती होण्याच्यादृष्टीने राजकीय पक्षांनी मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधींची लवकरात लवकर नेमणूक करावी, असे आवाहन उपजिल्हा निवडणूक अधिकारी मीनल कळसकर यांनी केले.

मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) कार्यक्रमाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालय येथे आयोजित राजकीय पक्षांसोबतच्या बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी तहसीलदार शीतल मुळे-भामरे, स्वप्नील खोल्लम यांच्यासह राष्ट्रीय काँग्रेस पक्ष, भारतीय जनता पार्टी, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार), राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार), महाराष्ट्र नवनिर्माण सेना, नॅशनल पिपल्स पार्टीचे पदाधिकारी उपस्थित होते. श्रीमती कळसकर म्हणाल्या, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या सूचनेप्रमाणे एसआयआर कार्यक्रमाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबत माहिती देण्यासाठी प्रत्येक बुधवारी राजकीय पक्षांसोबत जिल्हाधिकारी कार्यालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांतर्गत २९ जूनपर्यंत मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना (बीएलओ) प्रशिक्षण व गणना अर्ज छपाई करण्याचे नियोजन करण्यात आले असून त्यानुसार कार्यवाही सुरु आहे. राजकीय पक्षांनाही या प्रकियेबाबत सुरुवातीपासूनच विस्तृत माहिती देण्याकरिता लवकरच जिल्ह्यात प्रशिक्षण सत्राचे आयोजन केले जाणार आहे. या प्रशिक्षण सत्राच्या माध्यमातून विविध राजकीय पक्षांच्या मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधींना एसआयआर प्रकियेबाबत माहिती देण्यात येणार आहे. त्यामुळे राजकीय पक्षांनी लवकरात लवकर बीएलएची नेमणूक करावी जेणेकरुन बीएलओ आणि बीएलए संयुक्तरित्या बैठक घेवून ही संपूर्ण प्रक्रिया समजून घेणार आहे. एसआयआरच्या अनुषंगाने सुनावणी घेण्याकरिता जिल्ह्यात 21 मतदार नोंदणी अधिकारी आणि 544 सहायक मतदार नोंदणी अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. राजकीय पक्षांनी 'ईसीआय नेट' (ECINET) ॲप्लिकेशन डाऊनलोड करुन घ्यावे. विविध माध्यमांद्वारे एसआयआरबाबत जनजागृती करण्यात येईल, निवडणूक आयोगाने ही प्रक्रिया पूर्णपणे निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने राबविली जाईल तसेच कोणत्याही पात्र मतदाराचे नाव वगळले जाणार नाही, अशी ग्वाही श्रीमती कळसकर यांनी यावेळी दिली.

यावेळी राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी विधानसभा मतदारसंघ निहाय अनमॅपिग मतदार यादीची मागणी केली असता ती लवकरच उपलब्ध करुन देण्यात येईल, असे श्रीमती कळसकर यांनी सांगितले.

## धोकादायक पद्धतीने गॅसच्या अवैध रिफिलिंगचा गोरखधंदा तेजीत; चाकण भागातील स्थिती

चाकण (दै. संध्या)

दिवसेंदिवस विस्तारत चाललेल्या चाकण भागात घरगुती वापराच्या गॅस सिलिंडर मधून इतर छोट्या सिलिंडर किंवा व्यावसायिक वापरासाठीच्या सिलिंडर मध्ये बेकायदेशीररित्या गॅस भरून देण्याचा गोरख धंदा चाकण भागात फोफावला आहे. विनापरवाना गॅस भरून देण्याचे



प्रकार शहरात वाढले आहेत. पोलिसांकडून वारंवार कारवाई करून गुन्हे दाखल केले जात असले तरीही अवैध रिफिलिंगचा उद्योग अद्यापही राजरोसपणे सुरूच असल्याचे चित्र आहे. शहरातील काही भागात तसेच परिसरात गॅस एजन्सीची दुकाने, टपऱ्या, गाळे, गोदामे व वस्त्यांमध्ये कोणत्याही सुरक्षा उपायांशिवाय गॅस रिफिलिंग केले जात असल्याची बाब समोर आली आहे. धक्कादायक म्हणजे घरगुती गॅस सिलिंडर मधील गॅस रबर पाईप, रेगुलेटर आणि इतर उपकरणांच्या सहाय्याने दुसऱ्या सिलिंडरमध्ये भरतात. ही प्रक्रिया कोणत्याही तांत्रिक मानकांचे पालन न करता केली जात आहे. काही ठिकाणी एका घरगुती सिलिंडरमधून अनेक लहान सिलेंडर भरून त्यांची जादा दराने विक्री केली जात असल्याचे समोर आले आहे.

अवघ्या जून महिन्यातील दोन तारखेला चाकण जवळील महाळुंगे इंगळे येथे दोघांवर गुन्हा दाखल झाला आहे. तीन जूनला चाकण मार्केट यार्ड जवळील एका गॅस एजन्सीतील कारवाईत तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला. तसेच दहा जूनला निघोजे येथे एकावर पुन्हा दाखल झाला होता. त्याचप्रमाणे खेड तालुक्यातील चिंबळी गावच्या हद्दीतील लोखंडे वस्तीत एकाला याप्रकरणी अटक करण्यात आली होती. अवैधरित्या गॅस रिफिलिंग केल्याप्रकरणी यापूर्वी पोलीस प्रशासनाकडून वेळोवेळी छापे टाकून सिलिंडर, वाहनांसह साहित्य जप्त करण्यात आले.

# जेजुरी पोलीस स्टेशन हद्दीतील रस्ते ब्लॅक स्पॉटची पाहणी

## उपाय योजना बाबत निर्णय

जेजुरी (दै. संध्या)

महाराष्ट्र शासनाच्या रस्ते अपघातामध्ये 15 टक्के घट करण्याच्या उद्दिष्टानुसार जेजुरी पोलीस स्टेशन हददीतील अपघात प्रवण (ब्लॅक स्पॉटची) संयुक्त पाहणी करण्यात आली. या अभियाना वेळी उपविभागीय पोलिस अधिकारी राजेंद्रसिंह गौर, जेजुरी पोलीस स्टेशनचे पोलिस निरीक्षक रवींद्र पाटील, महामार्ग पोलीस सहाय्यक निरीक्षक सागर ढाकणे, परीवहन निरीक्षक जयवंत पोळ, सागर पाटील, प्रसाद सुरवसे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप अभियंता नागेष जाधव, माधुरी भोसले, पोलीस उप निरीक्षक उदय पवार,शिवाजी काटे पोलीस हवालदार विनोद देशमुख विनोद माने, विविध विभागाचे अधिकारी महेष क्षिरसागर, रोहन जगताप, फारूक सय्यद आदी सहभागी झाले होते. यावेळी जेजुरी मोरगाव रोड रेल्वे ब्रिज, काळा ओढा, नाझरे कप फाटा मावडी बस स्टॉप मावडी, जेजुरी निरा रोड एमआयडी चौक, दौडंज खिंड, भैरवनाथ मंदीर दौडज, पिंपरी खुर्द, जेजुरी सासवड रोड आय सी यु हॉस्पीटल, विठठल ढाबा या अपघात प्रवण रस्त्याची पाहणी करण्यात आली. या ठिकाणी अपघात होण्याची कारणे, वाहतुकीची परीस्थीती, रस्त्याची रचना, दिशादर्शक फलक, वेगनियंत्रण उपाय योजना, तसेच रस्ते सुरक्षा संबंधीत बांबीचा आढावा घेण्यात आला. आवश्यक त्या ठिकाणी परावर्तीत (Reflective) सुचना फलक, दिशादर्शक फलक बसविणे. स्पीड लिमीट बोर्ड बसविणे, कॅशन बोर्ड,व रंबल स्ट्रिप्स बसविणे, रस्ता चिन्हांकन (Road Marking) व झेब्रा क्रॉसिंग स्पश्ट करणे, डिव्हायडर चैक परीसरात परावर्तीत कॅट आय बसविणे,अपघात प्रवण ठिकाणी प्रकाश व्यवस्था सुधारीत



करणे, रस्त्यावरील अडथळे व दृश्यात अडथळा निर्माण करणारी झाडी हटविणे, जनजागृती मोहिमे सुरू करणे. या सर्व अपघात प्रवण क्षेत्रात तातडीने उपाय योजना करण्याचे निर्णय घेण्यात आले,अशी माहिती पोलिस निरीक्षक रवींद्र पाटील,उपनिरीक्षक उदय पवार,व हवालदार विनोद माने यांनी दिली.

